सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, २५ नोव्हेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २४१ | पाने : ४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जो देश आपला इतिहास जपतो, त्यांचे भविष्यही सुरक्षित राहते : पंतप्रधान

नवी दिल्ली, २४ नोव्हेंबर : जो देश, जे स्थान, आपला इतिहास जपतात, त्यांचे भविष्यही सुरक्षित राहते. हाच विचार करून गावांचा इतिहास जतन करण्यासाठी एक डिरेक्टरी-निर्देशिका तयार करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. भारताच्या सागरी प्रवासाच्या प्राचीन क्षमतेशी संबंधित पुरावे जतन करण्याची मोहीमही देशात सुरू आहे. या अनुषंगाने लोथलमध्ये एक मोठे संग्रहालय देखील बनवले जात आहे, जर तुमच्याकडे कोणतेही हस्तलिखित, कोणतेही ऐतिहासिक दस्तऐवज, कोणत्याही हस्तलिखिताची प्रत असेल तर तुम्ही ती भारतीय राष्ट्रीय अभिलेखागाराच्या मदतीने जतन करू शकता, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. 'मन की बात' (११६ वा भाग) कार्यक्रमातून त्यांनी देशवासियांशी संवाद साधला.

पंतप्रधान पुढे म्हणाले, विदेश दौऱ्यादरम्यान मला स्लोव्हाकियामध्ये होत असलेल्या अशाच आणखी एका प्रयत्नाची माहिती मिळाली आहे. जो आपल्या संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्याशी संबंधित आहे. इथे प्रथमच, आपल्या उपनिषदांचा स्लोव्हाक भाषेत अनुवाद झाला आहे. या प्रयत्नांतून भारतीय संस्कृतीचा जागतिक प्रभावही दिसून येतो. आपल्या सर्वांसाठी ही अभिमानाची गोष्ट आहे की जगभरात असे कोट्यवधी लोक आहेत ज्यांच्या हृदयात भारत वसतो.

मी परवा रात्रीच दक्षिण अमेरिकेतील गयाना या देशातून परतलो आहे. भारतापासून हजारो किलोमीटर दूर, गयानामध्येही एक 'मिनी भारत' वसला आहे. सुमारे १८० वर्षांपूर्वी गयानात, भारतातील लोकांना शेतात काम करण्यासाठी आणि इतर कामांसाठी नेण्यात आले होते. आज गयानामधील भारतीय वंशाचे लोक, राजकारण, व्यवसाय, शिक्षण आणि संस्कृती या प्रत्येक क्षेत्रात गयानाचे नेतृत्व करत आहेत. गयानाचे अध्यक्ष डॉ. इरफान अली हे देखील भारतीय वंशाचे आहेत, ज्यांना आपल्या भारतीय वारशाचा अभिमान आहे.



मी गयानामध्ये असताना माझ्या मनात एक विचार आला – जो मी तुम्हाला 'मन की बात' मध्ये सांगत आहे. गयानाप्रमाणेच जगातील डझनभर देशांमध्ये लाखो भारतीय आहेत. काही दशकांपूर्वीच्या, २००-३०० वर्षांपूर्वीच्या त्यांच्या पूर्वजांच्या स्वतःच्या अशा कथा आहेत. भारतीय स्थलांतरितांनी वेगवेगळ्या देशांमध्ये आपला ठसा कसा उमटवला याच्या कथा तुम्हाला सापडतील का! तिथल्या स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी कसा भाग घेतला! त्यांनी आपला भारतीय वारसा कसा जिवंत ठेवला? माझी अशी इच्छा आहे की तुम्ही अशा सत्य कथा शोधाव्यात आणि त्या मला सांगाव्यात. तुम्ही या कथा नमो पवर किंवा MyGov वर, IndianDiasporaStories या हॅशटॅग वर देखील शेअर करू शकता.

ओमानमध्ये सुरू असलेला एक अनोखा प्रकल्पही तुम्हाला खूप मनोरंजक वाटेल. ओमानमध्ये अनेक भारतीय कुटुंबे अनेक शतकांपासून राहत आहेत. त्यापैकी बहुतांश, गुजरातमधील कच्छमधून स्थायिक झाली आहेत. या लोकांनी व्यापाराचे महत्त्वाचे दुवे निर्माण केले होते. आजही त्यांच्याकडे ओमानी नागरिकत्व आहे, पण भारतीयत्व त्यांच्या नसानसात भिनले आहे. ओमानमधील भारतीय दूतावास आणि भारतीय राष्ट्रीय अभिलेखागार यांच्या संयुक्त विद्यमाने एका पथकाने, या कुटुंबांचा इतिहास जतन करण्याचे काम सुरू केले आहे. या मोहिमेअंतर्गत आतापर्यंत, हजारो कागदपत्रे जमा करण्यात आली आहेत. यामध्ये रोजनिशी, खाते वही, लेजर- नोंदवही, पत्रे आणि तारा यांचा समावेश आहे. यातील काही कागदपत्रे १८३८ सालातील देखील आहेत. ही कागदपत्रे भावनांनी ओथंबलेली आहेत. अनेक वर्षांपूर्वी जेव्हा ते ओमानला पोहोचले तेव्हा त्यांनी कोणत्या प्रकारचे जीवन अनुभवले, कोणत्या प्रकारच्या सुख-दुःखाचा सामना केला आणि ओमानच्या लोकांशी त्याचे संबंध कसे वाढले – हे सर्व या कागदपत्रांमध्ये सामावले आहे. 'ओरल हिस्ट्री प्रोजेक्ट' हा मौखिक इतिहास प्रकल्प देखील या उपक्रमाचा महत्त्वाचा आधार आहे. या उपक्रमात, तेथील ज्येष्ठांनी आपले अनुभव सांगितले आहेत. लोकांनी तिथल्या त्यांच्या राहणीमानाशी संबंधित गोष्टी, सविस्तरपणे सांगितल्या आहेत.

मित्रांनो, असाच एक 'ओरल हिस्ट्री प्रोजेक्ट' भारतातही सुरू आहे. या प्रकल्पांतर्गत, देशाच्या फाळणीच्या काळात बळी गेलेल्यांचे अनुभव, इतिहासप्रेमी गोळा करत आहेत. आता देशात असे फार कमी लोक उरले आहेत ज्यांनी फाळणीची भीषणता पाहिली- अनुभवली आहे. अशा परिस्थितीत हा प्रयत्न अधिक महत्त्वाचा ठरला आहे.

# महायुती-२ मध्ये मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीसच?

## शिंदे व अजित पवार उपमुख्यमंत्री आज शपथविधी

तभा वृत्तसेवा/ जमीर काझी
मुंबई, दि.२४ नोव्हेंबर:

विधानसभा निवडणुकीतील ऐतिहासिक विजयानंतर महायुती-२ सरकारची सोमवारी स्थापना होत आहे मात्र यावेळी सर्वाधिक जागा जिंकलेल्या भाजप आणि मुख्यमंत्रीपद आपल्याकडे ठेवण्याचे निश्चित केले असून त्यासाठी देवेंद्र फडणवीस यांचे नाव जवळपास निश्चित झाले असल्याचे सांगण्यात येते . भाजपा श्रेष्ठीकडून त् हिरवा कंदील मिळाल्यानंतर रात्री उशिरा केव्हा सोमवारी ते जाहीर केले जाईल, असे भाजपच्या बड्या नेत्याकडून सांगण्यात आले. तर मावळत्या सरकार प्रमाणेच या सरकारमध्येही दोन उपमुख्यमंत्री असणार असून शिवसेनेकडून एकनाथ शिंदे तर राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार हे त्यासाठी शपथ घेतील ,हे जवळपास निश्चित झाले आहे .

शिवसेनेकडून एकनाथ शिंदेच पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत अशी आग्रह केला जात असलातरी भाजपाच्या आमदारांच्या प्रचंड संख्येमुळे यावेळी हे पद जाऊ न देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे सांगण्यात आले.

विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीने तब्बल २३६ जागा जिंकत मोठा विक्रम केला आहे त्यामध्ये सर्वाधिक १३२ आमदार हे निव्वळ भाजपाचे आहेत तर शिंदे गटाचे ५७ व अजित पवार गटाचे ४१ आमदार निवडून आले आहेत. विरोधी महाविकास आघाडीला जेमतेम ४८ जागा मिळवता आल्या तर अन्य दहा आमदार निवडून आले आहेत. मावळत्या विधान सभेचा कार्यकाळ २६ नोव्हेंबरला संपत असून आज राज्य निवडणूक आयोगाच्या मुख्याधिकाऱ्यांनी राज्यपालांची भेट घेत विधानसभा निवडणुकीचा निकाल राजपत्राची प्रत व नूतन सदस्यांची नावांची यादी राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांना सादर केले त्यामुळे सोमवारी नवीन सरकार स्थापन होणार हे जवळपास निश्चित झाले असून भाजपाने मुख्यमंत्रीपद आपल्याकडे ठेवण्याचा निर्णय घेतला आहे त्यासाठी सर्वांची पसंती पक्षाचे मुख्य नेते देवेंद्र फडणवीस यांनाच असून त्यांच्या 'चाणक्य' नीतीमुळे ऐतिहासिक कामगिरी पक्षाने बजावली आहे. अडीच वर्षांपूर्वी महाविकास आघाडी ला हटवून सत्ता स्थापन करताना भाजपाने मुख्यमंत्री पदाचा त्याग केला होता. मात्र यावेळी अशी करण्याची आवश्यकता नसल्याचे पक्षांच्या नेत्यांचे म्हणणे आहेत. त्यामुळे भाजपाचा मुख्यमंत्री व शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसचा उपमुख्यमंत्री असा फॉर्मुला जवळपास निश्चित झाला आहे मुख्यमंत्री पदासाठी भाजपाकडून देवेंद्र फडणवीस यांचेच नाव आघाडीवर असून दिल्लीतील श्रेष्ठींची संमती मिळाल्यानंतर ते जाहीर केले जाणार आहे.

### शिंदे गटाकडून मुख्यमंत्रीपदासाठी आग्रह

निवडणुकीपूर्वी महायुतीने मुख्यमंत्री पदाचा चेहरा जाहीर केलेला नव्हता मात्र मावळते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवल्या होत्या. तसेच मुख्यमंत्री पदासाठी संख्याबळ अचाही निर्णय झालेला नव्हता त्यामुळे एकनाथ शिंदे यांना पुन्हा संधी मिळाली हवी असं मागणी त्यांच्या पक्षाचे आमदाराकडून होत आहे जरी अडीच अडीच वर्षासाठी हे पद देण्याचे निश्चित झाले तरी पहिल्यांदा शिंदे यांना संधी द्यावी असेही त्यांच्याकडून मागणी होत आहे. मात्र भाजपाकडे १३२ आमदार असल्याने मुख्यमंत्री पद त्यांच्याकडेच ठेवण्याचे महायुतीच्या बैठकीत निश्चित करण्यात आले आहे शिंदे गटाकडूनही त्याला विरोध होऊ शकणार नाही.

# अब्दुल सत्तार विजयी होताच कार्यकर्त्यांचा जल्लोष



सिल्लोड प्रतिनिधी : शिवसेना नेते अब्दुल सत्तार यांचा विजय होताच कार्यकर्त्यांच्या वतीने एकच जल्लोष करण्यात आला. एकमेकांना पेढे, लाडू भरवत कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी फुलांनी सजविलेल्या वाहनातून अब्दुल सत्तार यांनी शुभेच्छा स्वीकारल्या. यावेळी अर्जुन पाटील गाढे, अब्दुल समीर अ. सत्तार, श्रीराम पा. महाजन , विनोद मंडलेचा, अब्दुल आमेर, रामदास पालोदकर, दामू अण्णा गव्हाणे, नंदकिशोर सहारे, राजेंद्र ठोंबरे,सुधाकर पाटील ,नरेंद्र बापू पाटील, सुदर्शन अग्रवाल, अकील वसईकर, किशोर अग्रवाल, रमेश साळवे, रउफ बागवान, राहुल सपकाळ, रईस मुजावर, प्रशांत क्षीरसागर, आसिफ बागवान, हनिफ मुलतानी शेख मोईज यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# महायुतीच्या महाविजयाची, मविआच्या पराभवाची कारणमीमांसा

मुंबई, २४ नोव्हेंबर : लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीला मिळालेल्या अपयशानंतर विधानसभा निवडणुकीत अभूतपूर्व निकाल लागला. यात महायुतीचे २३६, तर महाविकास आघाडीला अवघे ४९ सदस्य निवडून आले. राजकीय तज्ञांच्या मते महायुतीच्या महाविजय आणि मविआच्या पराजयाची काही प्रमुख कारणे पुढे आली आहेत.

महायुतीच्या विजयामागील प्रमुख कारणे पाहिल्यास लाडकी बहीण योजना, हिंदुत्वाचा मुद्दा, ओबीसींचे एकत्रीकरण, मतदानाचा वाढलेला टक्का आणि प्रभावी नियोजन आणि सूक्ष्म व्यवस्थापन ही आहेत. तसेच मविआच्या पराभवामागे अती आत्मविश्वास, पक्षांतर्गत कुरघोड्या, जागावाटपातील चुका, मुख्यमंत्रिपदाचा वाद,



काँग्रेसमधील बंडखोरी ही प्रमुख कराणे असल्याचे सांगितले जात आहे.

राजकीय तज्ञांच्या मते, महायुतीच्या विजयात लाडकी बहीण योजनेचा वाटा मोठा आहे. लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महायुती सरकारनं महिलांच्या खात्यात १,५०० रुपये देण्याची हमी दिली. निवडणुकीपूर्वी अनेक महिलांच्या खात्यात साडेसात हजार रुपये जमा झाले होते. यातून महिलांची भूमिका आपल्याकडे वळवण्यात महायुतीला यश आले आहे. महायुतीनं हिंदुत्वाचा मुद्दा जोर धरून चालवला. 'बटेंगे तो कटेंगे', 'एक है तो सेफ है'चे नारे प्रचारसभेतून गाजले. मतदारसंघांवर याचा परिणाम दिसून आला. लोकसभा निवडणुकीत तुम्ही गाफील राहिल्यानं त्याचा हिंदुत्ववादी पक्षांना फटका बसला, हा नरेटिव्ह मतदारांमध्ये रुजवण्यात भाजपला यश आलं.

हरियाणा प्रमाणेच महाराष्ट्रात ओबीसींना एकवटणे भारतीय जनता पक्षाला शक्य झाले. महाराष्ट्रात गेल्या काही निवडणुकांपासून ओबीसी मतदार हा भाजपसोबत राहिलेला आहेच. मराठा आरक्षण आंदोलनाचा परिणाम ओबीसी भाजपमागे एकवटण्यात झाला. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत यंदाच्या निवडणुकीत तीन ते चार टक्क्यांनी मतदानात वाढ पाहायला मिळाली. २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीमध्ये ६१,४० टक्के मतदान झालं होतं. मात्र, २०२४ च्या निवडणुकीमध्ये ६५ टक्के मतदान झाले. जास्त मतदान झाले, तर ते सत्ताधाऱ्यांच्या विरोधात जातं असं काही विश्लेषकांचं मत आहे. पण या निवडणुकीत समोर आलेले निकालाचे आकडे जाणकारांनी वर्तविलेल्या आकड्यांच्या उलट आहेत. तसेच भाजपने लोकसभा आणि हरियाणा निवडणुकीतून धडा घेऊन निवडणूक व्यवस्थापनावर अधिक लक्ष केंद्रित केलं होतं. तसेच, अधिकाधिक मतदान आपल्या बाजूने व्हावं, यासाठी प्रयत्न केले. भाजपने विधानसभेच्या पार्श्वभूमीवर सूक्ष्म व्यवस्थापन केले.

# एकनाथ शिंदे शिवसेनेच्या तर अजित पवार राष्ट्रवादीच्या गटनेतेपदी

## पक्षाच्या आमदारांच्या बैठकीत निर्णय

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.२४: विधानसभा निवडणुकीतील अबूतपूर्व देशानंतर सत्ताधारी महायुतीने पुन्हा सत्ता स्थापनेसाठी जोरदार हालचाली सुरू केले आहेत महायुतीतील घटक पक्ष असलेल्या शिवसेना विधिमंडळ गट नेतेपदी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची निवड केली तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्यानी विधीमंडळ गट नेतेपदी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांची एकमताने नियुक्ती केली आहे.

विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड बहुमत मिळाल्याने एखादी सत्ता ताब्यात आली आहे त्यामुळे मंगळवारी सोमवारी शपथविधी होणार असून त्यासाठी तिने प्रमुख पक्षांच्या नेत्यांनी आपापल्या नूतन आमदारासमवेत बैठक व चर्चा केली त्यासाठी रविवारी सर्व निवडून आलेल्या आमदारांना मुंबईत पाचारण करण्यात आले होते शिवसेनेच्या आमदारांची हॉटेल ग्रँड आयात येथे बैठक झाली यावेळी सर्व आमदारांनी एकमताने कोकणात शिंदे यांची विधिमंडळातील घडून येते म्हणून नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला खासदार नरेश मस्के यांनी हा ठराव मांडला व त्याला अन्य आमदारांनी एकमताने संमती दिली. , यावेळी सरकार स्थापनेबाबत घटक पक्षाशी चर्चा करण्याची व निर्णय घेण्याचे सर्व अधिकार शिंदे यांना देण्यात निर्णय घेण्यात आला.

दरम्यान ,राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व प्रमुख नेते व आमदारांची आज सकाळी अजित पवार यांच्या देवगिरी बंगल्यावर बैठक झाली . त्यामध्ये अजित पवार यांची विधिमंडळाच्या गटनेते पदी निवड केली आहे. यावे पक्षाचे कार्याध्यक्ष का प्रफुल्ल पटेल प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे छगन भुजबळ व अन्य प्रमुख नेते उपस्थित होते.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीमध्ये यंदा महायुतीला बहुमत मिळाले आहे. तर महाविकासआघाडीचा दारुण पराभव झालाय. यामध्ये भाजप १३२ जागा, शिवसेना शिंदे गट ५७ आणि राष्ट्रवादी अजित पवार गट ४१ जागांवर आघाडीवर आहेत. अजित पवार गटाने या निवडणुकीत केवळ ५३ ठिकाणी उमेदवार दिले होते. त्यापैकी तब्बल ४१ जागांवर अजित पवार गटाच्या उमेदवारांचा विजय झाला आहे.



### मुख्यमंत्रीपद चा निर्णय भाजपाचे वरिष्ठ नेते घेतील :तटकरे

अजित पवार आमचे नेते अजित पवार यांना मुख्यमंत्री मिळावे अशी आमची इच्छा असली तरीही सध्याच्या परिस्थितीत ते शक्य नाही त्यामुळे मुख्यमंत्रीपदाचा निर्णय भाजप चे वरिष्ठ नेते घेतील, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिली.

### एकनाथ शिंदेच मुख्यमंत्री व्हावेत शिरसाट

महायुतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या चेहरा समोर करीत विधानसभा निवडणूक लढवल्या व प्रचंड बहुमत मिळवले. त्यामुळे मुख्यमंत्रीपद त्यांच्याकडेच राहावा असा आमचा आग्रह आहे अशी मागणी शिंदे गटाचे प्रवक्ते आ.शिरसाट यांनी केली आहे. भाजपा व शिंदे गटात अडीच-अडीच वर्षाचा मुख्यमंत्री पदाच फॉर्मुला निश्चित झाल्यास पहिल्यांदा एकनाथ शिंदे यांना संधी द्यायला हवी असेही त्यांनी स्पष्ट केले

# ऐतिहासिक विजयानंतर भाजपाचा सदस्यता नोंदणी करण्याचा संकल्प

## नोंदणी अभियानाला प्रारंभ

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.२४ नोव्हेंबर:

विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक विजयानंतर भाजपाने आता सदस्यता मोहीम हाती घेतली आहे. भाजप प्रदेश मुख्यालयात पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वाखाली रविवारी सदस्यता अभियान सुरू करण्यात आले.

देशात भाजपाची सदस्यता मोहीम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सुरू करण्यात आली. मात्र विधानसभा निवडणुकीमुळे महाराष्ट्रात अभियान राबविण्यात आले नव्हते .आता ऐतिहासिक विजय मिळवल्यानंतर ऐतिहासिक सदस्यता नोंदणी करण्याचा संकल्प बैठकीत करण्यात आला आहे. मोबाईलवर मिस कॉलद्वारे मेंबरशिप करता येणार आहे. त्यासाठी तुमच्या फोनवरून ८८००००२०२४ या मोबाईल क्रमांकावर मिस कॉल करावा लागेल. मिस कॉल केल्यानंतर, तुम्हाला तुमच्या फोनवर एक मेसेज प्राप्त होईल, त्यामध्ये सदस्यत्व क्रमांक नमुद केलेल्या असणार आहे अभियानावेळी श्रीकांत भारतीय, विक्रांत पाटील, माधवी नाईक यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# निकालानंतर हिंगोलीत राडा, गोळीबारात तरुणासह चौघे जखमी

हिंगोली, २३ नोव्हेंबर : महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर हिंगोलीत शिंदे गट आणि भाजप कार्यकर्त्यांमध्ये हिंसक वाद झाल्याचे वृत्त आहे. २३ नोव्हेंबरला दुपारी दोनच्या सुमारास या घटनेत गोळीबार झाला, त्यामुळे एका तरुणासह चारजण जखमी झाले.

हाणामारीत भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष पप्पू चव्हाण यांच्या घरावर हल्ला केला गेला. त्यावेळी घरासमोरील दोन गाड्या फोडण्यात आल्या. गोळीबारात कळमनुरीतील नवनिर्वाचित आमदार संतोष बांगर यांच्या पुतण्याला गोळी लागल्याची माहिती आहे. त्यांना पुढील उपचारांसाठी हैदराबादला हलवण्यात आले आहे, तर इतर जखमींवर नांदेडमध्ये उपचार सुरू आहेत. तलवारीच्या वाराने पप्पू चव्हाण यांचे बंधू गंभीर जखमी झाले. याप्रकरणी हिंगोली पोलीस ठाण्यात ६०-७० लोकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजकीय वातावरण तापलेल्या या घटनेनंतर शहरात तणाव निर्माण झाला आहे. मराठवाड्यातील विधानसभेच्या चुरशीच्या निकालांदरम्यान अशा घटनांमुळे राज्यात अस्थिरता वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# राज्य विधानसभा निवडणुकीची अधिसूचना, राजपत्राच्या प्रती राज्यपालांना सादर

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.२४ नोव्हेंबर:

भारत निवडणूक आयोगाचे उप मुख्य निवडणूक आयुक्त हिरदेश कुमार व राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची रविवारी राजभवन येथे भेट घेतली .त्यांना विधानसभा निवडणुकीच्या जाहीर झालेल्या निकालाची अधिसूचना – निवडून आलेल्या सदस्यांची यादी – व राजपत्राची प्रत सादर केली.

विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकांचे निकाल २३ नोव्हेंबरला जाहिर करण्यात आले. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७३ मधील तरतूदीनुसार, या निवडणूकीमध्ये निवडून आलेल्या उमेदवारांची नावे, भारत निवडणूक आयोगाच्या दि. २४ नोव्हेंबर, २०२४ च्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली. हे राजपत्र व अधिसूचनेच्या प्रती निवडणूक आयोगाचे उप मुख्य निवडणूक आयुक्त व राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांनी आज राज्यपालांना सादर केल्या.

यावेळी राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी, सह मुख्य निवडणूक अधिकारी मनोहर पारकर, भारत निवडणूक आयोगाचे सचिव सुमन कुमार दास व कक्ष अधिकारी निरंजन कुमार शर्मा हे उपस्थित होते.



## संपादकीय

# द्वेष आणि तिरस्काराच्या राजकारणाचा पराभव

महाराष्ट्र आता खऱ्या अर्थाने पुरोगामी झाला आहे, हे महायुतीच्या विजयाने सिद्ध केले आहे. शरद पवार, उद्धव ठाकरे, नाना पटोले हे ज्या पुरोगामी महाराष्ट्राचा डांगोरा पिटत होते, तो महाराष्ट्र पुरोगामी नव्हताच मुळी. जातिद्वेष, तिरस्कार यांचा पराभव करत राज्यातल्या मतदारांनी ढोंगी लोकांना त्यांची जागा दाखवून दिली आहे. वर्षभर शिमगा करणाऱ्या मंडळींना त्यांची लायकीही दाखवून दिली आहे. भारतीय जनता पार्टी, शिवसेना शिंदे आणि अजित पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष यांचा समावेश असलेल्या महायुतीला अपेक्षेपेक्षाही जास्त जागा देत मतदारांनी ते सुजाण असल्याचे स्पष्ट केले आहे. कोणत्याही भूलथापांना, जातिद्वेषाला, तिरस्काराच्या भावनेला बळी न पडता मतदारांनी विश्वासाला, विकासाला, समाजोत्थानाला, प्रगतीला, राष्ट्रहिताला प्राधान्य दिले, हे पुरते साफ झाले आहे. ऊठसूट गद्दार, खोके, धोकेबाज, खंजीर, मिंधे, टरबुज्या अशा असंसदीय शब्दांचा वापर करीत विधिमंडळातील सन्माननीय सदस्यांना, राज्याच्या मुख्यमंत्र्यांना, उपमुख्यमंत्र्यांना हिणवणाऱ्या उबाठा यांना मतदारांनी उद्ध्वस्त केले आहे. पावसात भिजून मतदारांसमोर भाषण केले म्हणून सहानुभूती वारंवार मिळत नसते. अपवादात्मक परिस्थितीतच ती मिळते याचा विसर पडलेल्या काकांनाही मतदारांनी कायमचे घरी बसण्याचे संकेत दिले आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणात आपणच जाणते आहोत असा समज करून बसलेले काका देवेंद्र फडणवीस यांना सातत्याने कमी लेखण्याचा प्रयत्न करीत होते. काकांनीच कटकारस्थान करून जरांगे पाटलांना फडणवीस यांच्याविरुद्ध उभे केले होते आणि सातत्याने लक्ष्य केले होते, हे संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले. राजकारणातले सर्वांत चतुरपण फक्त आपल्याकडेच आहे या भ्रमात वावरणाऱ्या काकांना फडणवीस यांनी अशी धोबीपछाड दिली आहे, जिचा विसर त्यांना आणि त्यांच्या चेलेचपाट्यांना कधीच पडणार नाही. देवेंद्र फडणवीस यांनी कायम संयमाची भूमिका घेतली. शरद पवारांनी त्यांना अक्षरशः छळले. पण, फडणवीस यांनी संयम सोडला नाही. त्यांनी ध्येयाप्रत पोहोचण्याची आपली वाटचाल दमदारपणे सुरू ठेवली. संख्याबळ जास्त असतानाही शिंदेंना मुख्यमंत्रिपद देऊ करत आणि स्वतःकडे उपमुख्यमंत्रिपद घेत त्यांनी मनाचा मोठेपणा दाखवला होता याचा विसर पडता कामा नये. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे पुत्र उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी तर अतिशय खालच्या पातळीवर उतरून देवेंद्र फडणवीस यांना टीकेचे लक्ष्य केले होते. कधी त्यांच्या शरीरावरून तर कधी त्यांच्या पत्नीवरून उद्धवाने फडणवीस यांना अपमानित करण्याचा प्रयत्न केला. पण, संघ संस्कारांनी घडलेल्या फडणवीसांनी कधीही पातळी सोडली नाही आणि सभ्य भाषेतच टीकेला उत्तर दिले. उद्धव ठाकरे यांना खरे उत्तर मतदारांच्या माध्यमातून दिले आणि राजकारणात ते कसे अपात्र आहेत, हेही दाखवून दिले. उद्धव ठाकरे यांना पित्याच्या आक्रमक हिंदुत्वाचा विसर पडला होता. आमचे हिंदुत्व हे शेंडी-जानव्याचे नाही असे सांगत राज्यातल्या तमाम ब्राह्मणांचा अपमान करताना उद्धवाला थोडीही लाज कधी वाटली नव्हती. त्याच शेंडी-जानव्याचे शाप घेत त्यांनी निवडणूक लढवली आणि लाजिरवाण्या पराभवाचे धनी झाले. बाळासाहेबांनी कायम कट्टर हिंदुत्वाची भूमिका घेत भगवा फडकवण्याची जिद्द ठेवली होती. त्यांच्याचमुळे मनोहर जोशींसारखा ब्राह्मण माणूस महाराष्ट्राचा मुख्यमंत्रीही झाला होता. पण, पावसात भिजलेल्या काकांनी फेकलेल्या जाळ्यात अडकलेल्या उद्धवाला याचा विसर पडला आणि कारण नसताना ब्राह्मणांची शेंडी आणि जानवे काढत त्यांना अपमानित करण्याचे पाप केले. त्याच पापाचे फळ आज त्यांना मिळाले आहे. देवेंद्र फडणवीस हे जरी ब्राह्मण असले तरी त्यांनी कधीही जातीयवाद केला नाही. स्वतःला श्रेष्ठ न समजता सर्वांशी सलोख्याने राहणेच त्यांनी पसंत केले. पण, फडणवीस आपल्या पुढे जात आहेत, आपल्यापेक्षा सरस ठरत आहेत, ही बाब उद्धव यांना जाळ्यात ओढणाऱ्या काकांना रुचली नाही आणि त्यांनी जातीवरून फडणवीसांना लक्ष्य केले, हे उभ्या महाराष्ट्राने पाहिले. मराठा समाजबांधवांना आरक्षण मिळाले पाहिजे यासाठी फडणवीसांनी मुख्यमंत्री असताना प्रामाणिक प्रयत्न केले होते. मराठा समाजाला आरक्षण मिळू नये असे कुणीच कधी म्हटले नव्हते. असे असतानाही जरांगे पाटील यांनी फडणवीस यांना त्यांच्या जातीवरून लक्ष्य केले. फडणवीस यांनी बामणी कावा करू नये असे म्हणत जरांगे यांनी नेहमीच फडणवीस यांना हिणवण्याचा प्रयत्न केला, हेही सगळ्यांनी पाहिले आहे. पण, फडणवीस यांनी कधीही जातिद्वेष केला नाही. जरांगे यांना प्रत्युत्तरही दिले नाही. हा फडणवीस यांचा सुसंस्कृतपणा होता. जनतेला गृहीत धरून ज्यांनी भाजपाला हरविण्याचा चंग बांधला होता, तो सपशेल अपयशी ठरला आहे. महाराष्ट्र हे सभ्य समाजाचे प्रतिनिधित्व करणारे सुसंस्कृत राज्य आहे आणि कारण नसताना साजरा केला जाणारा शिमगा पसंत करत नाही, हे निवडणुकीच्या निकालांनी स्पष्ट केले आहे. पावसात भिजलेल्या काकांनी काँग्रेसमधून बाहेर पडत स्वतःचा पक्ष स्थापन केला, सत्तेसाठी काँग्रेससोबत हातमिळवणी केली. पण, कधीही ५०-६० पेक्षा जास्त जागा त्यांना स्वबळावर जिंकता आल्या नाहीत. याउलट ज्या देवेंद्र फडणवीस यांनी स्वबळावर शंभरपेक्षा जास्त जागा सलग तिसऱ्यांदा जिंकल्या, त्या त्यांना जातीच्या आधारे कमी लेखण्याचा, त्यांचा उपमर्द करण्याचाच अश्लाघ्य प्रयत्न काकांनी केला. या अपमानाला मतदारांनी ईव्हीएमच्या माध्यमातून चोख उत्तर दिले आहे. फडणवीस यांना चक्रव्यूहात अडकविण्याचा पुरेपूर प्रयत्न सर्व स्तरांतून करण्यात आला. काका, उबाठा आणि काँग्रेस या तीन विरोधकांनी एकत्र येत देवेंद्रांची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. पण, चक्रव्यूह यशस्वीरीत्या भेदत फडणवीस बाहेर पडले आणि चतुर खेळी करत तीनही मोठ्या विरोधकांना चारी मुंड्या चीत केले, हे संपूर्ण महाराष्ट्र पाहतो आहे. पुरोगामी महाराष्ट्राला जातिवाद मान्य नाही, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

लोकसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपाचे पानिपत झाले होते. त्यातून धडा घेत भाजपाने स्वतःमध्ये सुधारणा केली. जो अतिआत्मविश्वास निर्माण झाला होता, त्यातून भाजपा बाहेर पडली. निवडणुकीला सामोरे जाताना कशा प्रकारे नियोजन करायला हवे, यावर पक्षात चर्चा झाली. लोकसभा निवडणुकीतील पराभवाने खचून न जाता ताज्या दमाने आणि संयमाने भाजपाने योजनाबद्ध रीतीने निवडणूक लढवली आणि प्रचंड मोठा विजयही मिळवला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांनी अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने केलेले जनजागरण प्रभावी ठरले. समाज आणि राष्ट्रहिताचे सगळे मुद्दे समाजातील विविध घटकांपुढे मांडत, राष्ट्रापुढील समस्यांबाबत अवगत करत स्वयंसेवकांनी जी कामे केली, त्याला तोड नाही. संघ ही सांस्कृतिक राष्ट्रवाद जोपासणारी जगातील एकमेव संघटना आहे. या संघटनेने कायम विश्वबंधुत्वाचा पुरस्कार केला आहे. भारताला विश्वगुरुपदी नेण्यासाठी अखंड काम करणाऱ्या संघाने कधीही जात, पात, पंथ, प्रांत आणि भाषा या आधारे भेद केला नाही. अशा संघाकडून जेव्हा जनमत जागृत करण्याचा प्रयत्न केला जातो, तेव्हा या प्रयत्नांमध्ये अपयश येणे केवळ अशक्यच! केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भाजपाप्रणीत रालोआचे सरकार सत्तेत आहे. या सरकारने गेल्या साडेदहा वर्षांत देशाचा जो प्रचंड विकास केला तो जनतेपुढे आहेच. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, भाजपाध्यक्ष जे. पी. नड्डा, उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी, तसेच इतर नेत्यांनी महाराष्ट्रात येऊन ज्या सभा घेतल्या, त्यातून विकासाचे मुद्दे मांडले आणि जनमत आकर्षित केले. विकासाशिवाय, हिंदुत्वाचा मुद्दा प्रखरपणे मांडत, हिंदूंना एकजूट करण्यात आणि त्यांची मतं आपल्या पारड्यात आणण्यातही भाजपाला व महायुतीला मोठे यश मिळाल्याचे स्पष्ट दिसते आहे. केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी महाराष्ट्रात तब्बल ७२ प्रचार सभा घेतल्या. या सर्व सभांमधून त्यांनी विकासावर भर देतानाच काँग्रेसचे अपयशही मतदारांपुढे आणले. गडकरी यांची लोकप्रियता, त्यांची बोलण्याची शैली, मुद्दे मांडण्याची पद्धती लक्षात घेता त्यांना सर्वाधिक मागणी होती. भाजपाच नव्हे, तर शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या उमेदवारांनी गडकरी यांच्या सभा पाहिजे म्हणून मागणी केली होती. त्यामुळे महाराष्ट्रातील महायुतीच्या विजयात गडकरींचेही भरीव योगदान आहे, हे मान्य करावेच लागते. गेल्या अडीच वर्षांत मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी आणि उपमुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस आणि नंतर महायुतीत आलेल्या अजित पवार यांनी जे प्रचंड परिश्रम घेतलेत, त्यामुळे महायुतीला विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक यश मिळाले, हे कुणालाही नाकारता येत नाही. लाडकी बहीण योजना, श्रावण बाळ योजना, मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना अशा ज्या अनेक लोककल्याणकारी योजना महायुतीच्या सरकारने राबविल्यात त्यामुळे यशाला अधिक झळाळी प्राप्त झाली, हेही तेवढेच खरे! ▮

## प्रासंगिक

**दिनेश गुणे**

# यतो धर्मस्ततो जय:

हिंदू संस्कृतीचा मार्गदर्शक मानल्या जाणाऱ्या महाभारत या महाकाव्यात शिखंडी नावाच्या एका पात्राची गोष्ट आहे. कुरुक्षेत्रावर कौरव आणि पांडवांच्या धर्मयुद्धात कौरवांच्या बाजूने लढणाऱ्या गुरुवर्य भीष्माचार्यांचा पराक्रम अतुलनीय ठरत असल्याने हतबल झालेल्या पांडवांनी आपली चिंता श्रीकृष्णाकडे व्यक्त केली आणि श्रीकृष्णाने धर्मयुद्धाची नीती पांडवांस समजावून सांगितली. जेव्हा आपण धर्माच्या रक्षणासाठी संघर्ष करत असतो, तेव्हा धर्मच आपले रक्षण करत असतो आणि जिथे धर्म असतो तेथे विजय निश्चित असतो, त्यामुळे धर्माच्या विजयासाठी भीष्मांचा पराभव व्हायला हवा, त्यासाठी जो मार्ग शक्य आहे तो अवलंबिला पाहिजे असा धर्मोपदेश श्रीकृष्णाने केला. भीष्मांनी पूर्वायुष्यात नाकारलेल्या अंबा नावाच्या राजपुत्रीने संतप्त होऊन, भीष्मांनी केलेल्या अन्यायाचा बदला घेण्याची प्रतिज्ञा केली होती. तिने त्यासाठी शिखंडीच्या रूपात पुनर्जन्म घेतला आणि साहजिकच भीष्मांना रोखण्यासाठी पांडवांना शिखंडीची आठवण झाली. त्यांनी भर कुरुक्षेत्राच्या रणमैदानावर भीष्मांच्या समोर शिखंडीस उभे केले आणि शिखंडीच्या जन्माची कथा ठावूक असलेल्या भीष्मांनी शस्त्रे खाली ठेवली. आपल्यावरील पूर्वजन्मीच्या अन्यायाचा बदला घेण्याच्या अंबेच्या भावनेचा आदर करण्याची आणि तिला न्याय मिळवून देण्याची संधी म्हणून भीष्मांनी शिखंडीच्या बाणाने मृत्यू पत्करला आणि धर्मासाठी केल्या जाणाऱ्या संघर्षाचा जय होतो, हे सिद्ध करून दाखविले. हे भीष्मांचे थोरपण होते. आपण काही अपरिहार्यतेमुळे कौरवांच्या बाजूने लढत असलो तरी पांडवांची बाजू ही धर्माची बाजू आहे, हे त्यांनाही माहीत होते आणि धर्माचा विजय व्हावा ही त्यांचीही अपेक्षा होती. एका बाजूला धर्म आणि दुसऱ्या बाजूला निष्ठा अशा कोंडीत सापडलेल्या भीष्माचार्यांनीदेखील धर्माच्या विजयाकरिता स्वतःचे बलिदान दिले आणि निष्ठेहूनही धर्म मोठा असतो हा सिद्ध करणारा संदेश जगाला दिला. यतो धर्मस्ततो जयः आणि धर्मो रक्षति रक्षितः या दोन्ही सांस्कृतिक संदेशांचे श्रेष्ठत्व सिद्ध करणाऱ्या या कथेतून भीष्माचार्यांनी दिलेला धर्मरक्षणाचा संदेश भारतीय संस्कृतीने कित्येक पिढ्यांपासून सातत्याने जपला, जोपासला आणि त्यानुसार आचरण करण्याचाही प्रयत्न केला. जगातील अनेक प्राचीन संस्कृती आज एक तर लोप पावत चालल्या आहेत किंवा ज्या काही मोजक्या संस्कृती टिकून आहेत, त्यांच्यापुढे वेगवेगळ्या कारणांमुळे अस्तित्वाचा प्रश्न आहे. बळाच्या जोरावर आणि शस्त्रांच्या धाकाने संस्कृती संपवू पाहणाऱ्या प्रवृत्तींचे आक्रमण हे त्यापैकी एक कारण आहे. भारतीय संस्कृतीने मात्र धर्मपरंपरेचा सातत्याने सन्मान राखला, म्हणून ही संस्कृती हजारो वर्षांपासून टिकून आहे आणि तिचा प्रभावही कायम आहे, हे सातत्याने सिद्ध होत असते. म्हणूनच, धर्मासाठी आपले सर्वस्व पणाला लावण्याची संस्कृतीची शिकवण आजही जपली जाते.

महाभारतातील या कथेचा हा संदेश लक्षात घेतला, तर महाराष्ट्रातील ताज्या विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान जे काही घडले, त्याला धर्मयुद्ध असेच म्हणावे लागेल. आता रण होणार आणि त्यामध्ये विजयासाठीच लढावे लागणार असा नारा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला, तेव्हा पुरोगामी म्हणविणाऱ्या काही राजकीय संधिसाधूंचे चेहरे दुर्मुखले. त्यांनी या घोषणेवर चिंता व्यक्त करणारे सूर लावले आणि राज्यात धर्माच्या आधारावर सामाजिक फूट पाडण्याचे प्रयत्न होत असल्याचा आक्षेपही सुरू केला. पण तरीही, महाराष्ट्रातील या निवडणुका म्हणजे एक प्रकारे धर्मयुद्धच ठरले. एका बाजूला कडव्या, कट्टरपंथीयांच्या कारवायांमुळे समाजात पसरलेली अस्वस्थता, धार्मिक आक्रमणाची भीती, सामाजिक वा कौटुंबिक मालमत्तांच्या परंपरागत मालकीवरही उमटविली जाणारी प्रश्नचिन्हे, कौटुंबिक वंशव्यवस्थेच्या ऱ्हासाचे संकट अशा अनेक रूपांनी संस्कृतीवर आणि धर्मावर आक्रमण होण्याची पुसटशी चिन्हे दिसू लागलेली असताना, अशा चिन्हांच्या विरोधात, म्हणजेच धर्मयुद्धासाठी सज्ज झालेल्याच्या आणि त्यासाठी सोबत येण्याकरिता समाजास हाक देणाऱ्याच्या पाठीशी उभे राहणे ही तर संस्कृतीची शिकवणच होती. म्हणूनच, फडणवीस यांनी दिलेली हाक महाराष्ट्राच्या जनमानसाने ऐकली असावी, तिला प्रतिसाद दिला असावा. त्यामुळेच प्रचंड बहुमताचा कौल देऊन सत्तास्थापनेची संधी देत धर्मयुद्धाच्या पहिल्या टप्प्यातील ऐतिहासिक विजयही नोंदविला गेला असावा. विधानसभा निवडणुकीच्या ताज्या निकालाचे विश्लेषण करताना व भाजपाप्रणीत महायुतीच्या महाविजयाची मीमांसा करताना, धर्मयुद्धाच्या हाकेस जनतेने दिलेला अभूतपूर्व प्रतिसाद हेच कारण महत्त्वाचे मानले जाईल यात शंका नाही. अर्थात्, या धर्मयुद्धात समोरच्या, प्रतिस्पर्धी बाजूस कोणी भीष्माचार्य नव्हता आणि जे कोणी समोर उभे ठाकले होते, त्यांना आपण असत्याची बाजू घेत आहोत, याचीही जाणीव नव्हती. केवळ सत्ता हिसकावून घेणे आणि सत्तेचा झेंडा फडकावून आपल्या आपल्या सत्ताकांक्षा भागविणे एवढेच एकमेव साध्य असलेल्यांनी निवडणुकीस साधन मानले आणि या युद्धासाठी आपापली शस्त्रे परजली, एवढाच त्याचा अर्थ आहे. ज्याप्रमाणे समोर भीष्माचार्यांसारखी सत्याची चाड असलेला योद्धा समोर नव्हता, तसेच विद्यमान सत्तेच्या या बाजूला कोणी शिखंडीही नव्हता, हे या निवडणुकीचे महाभारतातील त्या कथाप्रसंगाहून वेगळेपण म्हणावे लागेल. धर्मयुद्धाच्या या निर्वाणीच्या लढ्यात महायुतीच्या बाजूने उभ्या ठाकलेल्या तमाम मतदाररूपी जनतेने धर्मरक्षणाच्या हाकेची गरज ओळखून त्यास साथ दिली आणि साहजिक असलेला पराभव महाविकास आघाडी या बेगडी नावाने एकत्र आलेल्या सत्ताकांक्षींच्या पदरात पाडला, एवढाच या निकालांचा स्पष्ट अर्थ आहे.

म्हणूनच, महाराष्ट्र विधानसभेच्या निमित्ताने झालेल्या निवडणुका म्हणजे धर्मयुद्ध ठरलेच, पण यतो धर्मस्ततो जयः हे ऐतिहासिक सांस्कृतिक, वचनही जनतेने सिद्ध करून दाखविले आहे. या युद्धास गेल्या पाच वर्षांतील अनेक राजकीय घडामोडींचीही पृष्ठभूमी आहे आणि अलिकडच्या काळात भेडसावू लागलेल्या काही सांस्कृतिक आक्रमणांच्या चाहुलीची भीतीदेखील आहे. व्होट जिहाद नावाचा एक प्रकार महाराष्ट्राच्या निवडणुकांत प्रभावी ठरत असल्याचे लोकसभा निवडणुकीदरम्यान स्पष्ट होऊ लागले होते. लोकसभेच्या काही मतदारसंघांतील काही भागांत याचे दाखलेही मिळाल्याचे महायुतीच्या



निदर्शनास आले होते. एकीकडे कट्टरतावादाने जगाच्या पाठीवर अनेक देशांत चिंतेचे आणि सामाजिक असुरक्षिततेचे सावट दाटलेले असताना, अशा शक्तींना खतपाणी घालण्यास साह्यभूत ठरू शकतील अशा कोणत्याही प्रकारांस वा प्रयत्नांस रोखणे हा धर्मयुद्धाहून वेगळा प्रकार नाही. कारण इथे संस्कृतीच नव्हे, तर मानवी हक्कांचा आणि सामाजिक सुरक्षिततेचा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. अशा प्रकारे कोणा विशिष्ट मानसिकतेस खतपाणी घालणे किंवा डोके वर काढण्याकरिता साह्यभूत ठरेल अशी कोणतीही कृती करणे अयोग्य असून, सामाजिक पाठिंब्याच्या जोरावर ती रोखणे गरजेचे भासते, तेव्हा तशी हाक देणे हेही गरजेचे असते. लोकसभा निवडणुकीतून डोकावू पाहणाऱ्या या प्रवृत्तींना रोखण्यासाठी धर्मयुद्धाची हाक देणे ही प्रतिक्रियावादी कृती समाजाने मान्य केली आणि तिला कौल देऊन भविष्यातील संकटाच्या शंका पुसण्याचा प्रयत्न केला, असाही या कौलाचा अर्थ मानता येईल. म्हणूनच, आज महायुतीच्या गळ्यात जनतेने टाकलेली विजयाची माळ म्हणजे धर्मयुद्धातील धर्माच्या बाजूने झालेला विजय आहे आणि जे धर्माचे रक्षण करतात, त्यांच्या रक्षणासाठी धर्मदेखील सज्ज असतो, याची ग्वाही देणारे आहे. राजकीयदृष्ट्या आणि लोकशाही संकेतांनुसार समाजाची धार्मिक आधारावर विभागणी करणे योग्य नाही, हे बरोबरच आहे. पण या धर्मयुद्धाने प्रत्येकास आपल्या धर्मावरील संकटाचे निराकरण करण्याचा हक्क अबाधित ठेवण्याचा विश्वास दिला, एवढाच निष्कर्ष जरूर काढता येईल. या धर्मयुद्धात महायुतीचा विजय झाल्याने कोणा एका विशिष्ट धर्माचे राज्य महाराष्ट्रात येणार व अन्य धर्मीयांच्या अस्तित्वावर प्रश्न उमटणार असे मुळीच नाही, हेदेखील सर्वांनाच माहीत आहे. लोकशाहीमध्ये सर्व धर्मांच्या समाजघटकांस आपले धार्मिक स्वातंत्र्य सांभाळण्याचा अबाधित हक्क आहे आणि त्यावर कधीही कोणत्याही अन्य धर्माने अतिक्रमण केलेले नाही. तसे करण्याचे जागतिक प्रयत्न येथपर्यंत पोहोचू नयेत यासाठी खबरदारी घेण्याची गरज मात्र या निमित्ताने समाजास पटली आणि त्यासाठी समाज एकवटला, हे स्पष्ट झाले आहे.

भाजपाप्रणीत महायुतीच्या निकालाचे आता अनेक अंगांनी विश्लेषण सुरू होईल. त्यामध्ये अनेक खऱ्याखोट्या कहाण्याही रंगवून समोर आणल्या जातील. पैशाच्या जोरावर मते मिळविल्याचा आरोप आताही होऊ लागला आहे. पण हे आक्षेप पराभूत पक्षांकडून किंवा त्यांच्या सहानुभूतिदारांकडून केले जातात हे लक्षात घेतले, तर या निकालांतून महायुतीस स्पष्ट कौल देणाऱ्या मतदारांच्या विवेकबुद्धीवरच प्रश्नचिन्हे उमटविली जातात, याचा अनेकदा विसर पडत असतो. हा निकाल उलटा, म्हणजे महाविकास आघाडीच्या बाजूने निर्विवादपणे लागला असता, तर या आक्षेपांना त्यांनी थारा दिला नसताच, पण मतदारांच्या सुज्ञपणाचे कौतुकही केले असते. मतदारांना समंजसपणे दिलेल्या कौलाचा आदरही केला असता आणि लोकशाहीचा विजय झाला असा डिंडिमही वाजविला असता. आता मात्र, महायुतीच्या पारड्यात एकमुखी कौल पडल्यानंतर महाविकास आघाडीचे नेते निवडणूक प्रक्रियेवरच शंका व्यक्त करू लागले आहेत. हा मतदारांचा कौलच नाही, अशी बेधडक विधानेही काही नेते करू लागले आहेत. काहींनी अगोदरच्या निवडणूक निकालांतील पराभवांनंतर व्यक्त होण्याच्या प्रथेप्रमाणे मतदान यंत्रांच्या सत्यतेवरच शंका उपस्थित केल्या आहेत. हा तर एक प्रकारे, निवडणुकीच्या निकालावर अविश्वास दाखवून लोकशाही प्रक्रियेच्या सन्मानालाच धक्का दिला गेला आहे. पण विजयावर प्रश्नचिन्हे उमटविण्यापेक्षा पराजयाची कारणमीमांसा शोधून, कमतरता शोधण्याची विरोधकांस अधिक गरज आहे. हे अद्याप बोलले जात नसेल, तर ती मात्र सुदृढ लोकशाहीसाठी चांगली बाब नाही. विधानसभा निवडणुकांच्या काळातील महाविकास आघाडीच्या नेत्यांची प्रचार पातळी किंवा जातिपातीच्या आणि समाजघटकांतील भेदाभेदास खतपाणी घातले जाईल अशा मुद्द्यांच्या आधारावर निवडणुका केंद्रित करण्याचे प्रयत्न या प्रचारादरम्यान झाले नाहीत असे म्हणता येणार नाही. लोकसभा निवडणुकीत आरक्षण रद्द करण्याच्या आणि संविधान बदलण्याच्या आरोपावरून भाजपाला लक्ष्य करण्याचा व जनतेत संभ्रम माजविण्याचा प्रयत्न विरोधकांनी करून पाहिला. हा गैरसमज रुजविण्यात विरोधकांना महाराष्ट्रात बऱ्यापैकी प्रतिसाद मिळाला आणि महायुतीला काहीसा फटकाही बसला. पण लोकसभा निवडणुकांनंतर मतदारांस आपली चूक लक्षात आली असावी. म्हणूनच, ते अपप्रचाराचे मुद्दे विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात चालले नाहीत. महाविकास आघाडीला सत्ताधारी महायुतीच्या विरोधातील आक्रमक मुद्दे सापडलेच नसल्याने त्याच जुन्या आणि तकलादू मुद्द्यांच्या आधारावर जनतेची भावनिक सहानुभूती मिळविण्याच्या प्रयत्नांवरच महाविकास आघाडीच्या अनेक नेत्यांचा भर राहिला, हे मागे वळून पाहिले असता स्पष्ट दिसते. गद्दार, पक्ष चोरला, पक्ष फोडला, असा आक्रोश करून जनतेच्या दरबारात न्याय मागण्याची भाषा वापरणाऱ्या नेत्यांनी जनमानसाच्या भावना आणि अपेक्षा मात्र लक्षातच घेतल्या नसाव्यात, असे दिसते. शिवसेनेत फूट पडल्यानंतर मूळ शिवसेना आपलीच असल्याचा दावा करणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्याकडे बाळासाहेब ठाकरे यांचे पुत्र एवढाच वारसा शिल्लक राहिला होता, पण बाळासाहेबांच्या विचारांचेही आपण कडवे वारस आहोत, हे सिद्ध करण्यात आणि जनतेला पटवून देण्यात ते कमी पडले असावेत. ज्या हिंदू मतदारांवर मदार ठेवून बाळासाहेबांनी राजकारण केले ते योग्य नव्हते अशी जाहीर कबुली देऊनच उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीच्या तंबूत प्रवेश केला होता. संघाच्या भगव्या ध्वजाची फडकं म्हणून खिल्ली उडविताना, समाजाच्या सांस्कृतिक भावनांनाही धक्का लावत असल्याची जाणीव झाली नसावी हेही त्यांना नाकारण्याचे एक कारण असावे. मुस्लिम समाज हा संपूर्ण समाजव्यवस्थेचा अविभाज्य घटक आहेच, त्याने या देशातील बहुसंख्य समाजाच्या संस्कृतीचा आणि आपल्या पूर्वपरंपरांचा आदर करूनच या देशातील समाजव्यवस्थेशी एकरूप राहिले पाहिजे, ही भावना आजवर हिंदू संघटनांच्या अनेक नेत्यांनीही व्यक्त केली आहे. मात्र, मतांसाठी लांगूलचालनाचे राजकारण त्यांनी साफ नाकारले. सर्वांना समान वागणूक दिली जावी, यावरच या नेत्यांचा भर राहिला. म्हणूनच, अल्पसंख्यकांना मतांच्या राजकारणासाठी लाडाची वागणूक देणाऱ्या राजकारणाविषयी समाजात अगोदरपासूनच असलेल्या रोषात इथे भर पडली असावी. ठाकरे यांनी शिवसेनेवर हक्क सांगताना, बाळासाहेब ठाकरे यांनी रुजविलेल्या शिवसेनेच्या मूळ विचारांकडे पाठ फिरविली, असा सर्वसामान्यांचा समज दूर करण्याचा फारसा प्रयत्नही त्यांनी केलेला दिसत नाही. त्यामुळे, महाविकास आघाडीची विश्वासार्हता वाढविण्याच्या प्रयत्नांकडे झालेले दुर्लक्ष, मतांच्या धार्मिक विभाजनासाठी झालेल्या प्रयत्नांस मिळालेले चोख सामूहिक प्रत्युत्तर व त्यासोबतच सरकारच्या समाजोपयोगी योजना, सुविधांचा विकास अशा बाबींना मिळालेला कौल याचा विचार करूनच विजयाची मीमांसा करावी लागेल. धर्मयुद्धात जय मिळतो, म्हणजे धर्माचा विजय होतो आणि जिथे धर्म असतो, तिथे विजय निश्चित असतो, हे निवडणुकीच्या राजकारणानेही सिद्ध केले, ही बाब विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने आता अधोरेखित होणार आहे. ▮

dineshgune@gmail.com

## विश्लेषण

**अशोक ढगे**

संपूर्ण देशाचे लक्ष लागून असणाऱ्या महाराष्ट्रातील निवडणुकांच्या निकालातून कल स्पष्ट झाला असून, लोकसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर नव्या दमाने आणि जोमाने पुढे आलेला भारतीय जनता पक्ष आणि महायुतीने मारलेली मुसंडी हे लक्षवेधी मुद्दे आगामी काळातील राजकारणाचे वारे निर्देशित आणि नियमित करणारे ठरणार आहेत. राज्यातील या निवडणुकीला राजकीय अस्थैर्य, विरोधकांचा तीव्र आणि टोकाचा विरोध, दिवसामाजी बिघडत जाणारे सामाजिक वातावरण याची किनार होतीच, खेरीज बदलापूरचे बालिका अत्याचार प्रकरण, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळणे, मराठा आंदोलनाने वातावरण गढूळ होणे आदी कारणेदेखील होती. खोके सरकार, गद्दार, आमदार अपात्रतेच्या मुद्याचा कोलाहलही पाठीमागे होताच. तशातच लोकसभा निवडणुकीमध्ये देशात जेमतेम तारल्या गेलेल्या भाजपाला राज्यातील जनतेने नाकारल्याचे चित्रही तणाव वाढवणारे होते. मात्र अशा तणावग्रस्त अवस्थेतही महायुतीने संयमाने आणि नेटक्या नियोजनानिशी परिस्थिती सावरली आणि नेत्यांपासून सर्वसामान्य कार्यकर्त्यांपर्यंत सगळ्यांनीच प्रयत्नपूर्वक जनमताचा कौल आपल्याकडे वळवण्यात यश संपादित केले.

थोडक्यात, हा जनतेने घेतलेला एक निर्णय असला तरी त्याचे अनेक अन्वयार्थ निघतात. या काळात संपूर्ण देशाने योगी आदित्यनाथ यांच्या 'बटेंगे तो कटेंगे' तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या 'एक हैं तो सेफ है'चा नारा ऐकला. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये तो लक्षवेधी ठरलेला दिसत आहे. त्यामुळेच महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालाचे कल भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीए आघाडीचे वादळ दर्शवत असणे स्वाभाविक आहे. महाराष्ट्रातील २८८ जागांमध्ये भाजपाच्या महायुती आघाडीला २२५ हून अधिक जागा मिळणे जनतेचा बदलता कल स्पष्ट करणारे आहे. दुसरीकडे, उत्तर प्रदेशमध्ये नऊ विधानसभा जागांसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत भाजपाला सात जागा मिळाल्या आहेत. या विजयाचे प्रमुख कारण ध्रुवीकरण असल्याचे मानले जात आहे. अर्थातच याचे विश्लेषण होत राहणार आहे.

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या विजयानंतर भाजप सावध झाला. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीला ४८ पैकी ३१, तर महायुतीला १७ जागा मिळाल्या. यानंतर भाजप आणि संघाने आपली रणनीती बदलली. अत्यंत सावधगिरीने योगी आणि मोदींनी बाजी मारली. २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीचे आकडे बघितले तर भाजपला १०५ जागा मिळाल्या होत्या. दुसरीकडे, शिवसेनेला (अविभाजित शिवसेना) ५६ जागा, राष्ट्रवादी काँग्रेसला (अविभाजित राष्ट्रवादी) ५४ जागा आणि काँग्रेसला ४४ जागा मिळाल्या होत्या. त्यानंतर शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेसने मिळून सरकार स्थापन केले. मात्र, ही आघाडी जास्त काळ सरकार चालवू शकली नाही. जून २०२२ मध्ये शिवसेनेतील अंतर्गत वादामुळे एकनाथ शिंदे वेगळे झाले. अजित पवारांनी राष्ट्रवादीतील एक गट सोबत आणला. यानंतर ते एकनाथ शिंदे यांच्या भाजप आणि शिवसेना सरकारमध्ये सामील झाले आणि उपमुख्यमंत्री झाले. राष्ट्रवादीच्या मतदारांना महायुतीकडे वळवण्यात या घटकांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्याच वेळी शिवसेनेच्या मतदारांना महायुतीशी जोडण्यातही शिंदे यांना यश आले. ताज्या निकालाने महाराष्ट्रातील मराठा फॅक्टर आणि बेरोजगारीचा मुद्दा महाविकास आघाडीच्या फायद्याचा राहिला नसल्याचे स्पष्ट केले आहे. किंबहुना, मतांच्या ध्रुवीकरणामुळे हे मुद्दे मागे पडले, असेही आपण म्हणू शकतो. त्याच वेळी देशभरात बळकट झालेल्या हिंदुत्वासारखा मुद्दा महायुतीने समोर आणला. महायुतीला अपेक्षेप्रमाणे योगी आणि मोदींच्या घोषणांची मोठी मदत मिळाली.

हरयाणामध्ये योगी आदित्यनाथ यांनी ही घोषणाबाजी केली आणि तिथे भाजपचा विजय झाला. मात्र, भाजपने योगींचे 'बटेंगे तो कटेंगे' असे बॅनर महाराष्ट्रात लावले तेव्हा तीव्र प्रतिक्रिया उमटल्या, कारण उत्तर प्रदेश किंवा

# जोर का झटका...

हरयाणाप्रमाणे महाराष्ट्रामध्ये हिंदुत्व प्रचलित नाही. पण, निकाल समोर आल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणातही ध्रुवीकरणाचे पर्व सुरू झाल्याचे जाणवले आहे. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने संविधान बचाओचा नारा दिला होता. ही घोषणा विशेषतः उत्तर प्रदेशमधील लोकसभा मतदारसंघांमध्ये कामी आली. मात्र महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत या घोषणेचा शून्य परिणाम बघायला मिळाला. खेरीज मराठा आरक्षणावरही काँग्रेस बाजी मारू न शकल्याचे चित्र दिसत आहे. सर्वांत महत्त्वाचा आणि लक्षात घेण्याजोगा मुद्दा म्हणजे महाराष्ट्र निवडणुकीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची मोलाची मदत झाली आहे. हरयाणाप्रमाणे येथेही संघाचे लोक भाजपच्या प्रचारासाठी सक्रिय होते. किंबहुना, लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशमध्ये भाजपच्या खराब कामगिरीचे कारण जनसंपर्क कमी पडणे, सर्वसामान्यांपर्यंत कार्यकर्ते न पोहोचणे हे मानले जात होते. मात्र ही चूक सुधारत महाराष्ट्रात संघ कार्यकर्ते प्रचारात उतरले. संघाच्या स्वयंसेवकांनी भाजपच्या मागे आपली शंभर टक्के ताकद लावली होती. भाजपलाच मत द्या, असा त्यांचा थेट प्रचार नसला तरी प्रत्यक्षपणे, अप्रत्यक्षपणे त्यांनी आपल्याच विचाराच्या भाजपला मोठे बळ देण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळेच यंदा गल्लोगल्ली, प्रत्येक वॉर्डमध्ये संघाची ताकद दिसली. त्यामुळेच भाजपकडे यशाचे पारडे मोठ्या प्रमाणात झुकले.

लोकसभा निवडणुकीमध्ये मुस्लिमांची एकगठ्ठा मते उद्धव ठाकरेंच्या पारड्यात पडली. मात्र आताच्या निवडणुकीत त्याच्या परिणामांची जाण करून देण्यात महायुती यशस्वी ठरली. लोकसभा निवडणुकीनंतर बांगलादेशमध्ये घडलेल्या घटना जनतेने उघड्या डोळ्यांनी पाहिल्या. जणू त्याला प्रतिक्रिया म्हणूनच सिमल्यातील एक अवैध मशीद पाडण्यासाठी तिथला समस्त हिंदू समाज एकवटलेला दिसला. म्हणजेच जातिपातीच्या, प्रांत, भाषेच्या नावाने आपण वेगवेगळे राहिलो तर आपल्यावर अतिक्रमण होईल, हे मत जनतेला पटलेले दिसले. एक राहिलो तर आपल्याकडे कोणी वाकड्या नजरेने पाहू शकणार नाही, कोणी हल्ला करणार नाही हा विचार स्वीकारल्याचेही जनतेने ताज्या निकालाद्वारे सूचित केले आहे. एकीचा हाच मुद्दा महाराष्ट्रात, विशेषतः ग्रामीण भागात वारकरी संप्रदायानेही उचलून धरला. त्यांनी छोट्या छोट्या गटसभा घेऊन, अगदी ५०-१०० लोकांच्या सभा घेत हा विचार पोहोचवण्याचे मोलाचे काम केले. एखाद्या देवळात, आवारात पार पडलेल्या अशा छोट्या सभांची संख्या ६० ते ७० हजारांच्या घरात होती. त्याचाही परिणाम ताज्या निकालावर प्रभावीपणे दिसून येत आहे.

या सगळ्याबरोबरच जनतेच्या डोळ्यासमोर महायुतीचे काम होतेच. मध्य प्रदेशातील भाजप सरकारच्या लाडली बहन योजनेनंतर महाराष्ट्रातील महायुती सरकारनेही मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली आणि वेगाने रेटली. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १,५०० रुपये दिले जात आहेत. भाजपच्या दणदणीत विजयात या घटकाचाही मोठा वाटा असल्याचे मानले जात आहे. विरोधकांनी या योजनेला मोठा विरोध केला. काही दिवसांमध्येच महिलांना पैसे मिळणे बंद होईल, सरकारची ही महत्त्वाकांक्षी योजना बंद होईल असे म्हणत एकीकडे त्यांनी अपप्रचार केला तर दुसरीकडे महाविकास आघाडीतील मोठ्या राजकीय पक्षांनी आपल्या प्रचारादरम्यान जाहीर केलेल्या जाहीरनाम्यामध्ये आपले सरकार सत्तेत आल्यास महिलांच्या खात्यात तीन हजार रुपये जमा करण्याच्या घोषणा केल्या. ही बाबही चाणाक्ष नागरिकांच्या नजरेतून सुटली नाही. खेरीज महाविकास आघाडीचा भाग असलेली काँग्रेस, उबाठा आणि शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस यांनी महागाई, बेरोजगारी या मुद्द्यांवर केलेला राज्य सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्नही तोकडा पडला. त्यांना जनतेचा पाठिंबा मिळेल, अशी आशा होती. पण, परिणाम उलटे झाले. महाराष्ट्रात सोयाबीनच्या हमीभावाचा मुद्दाही उपस्थित झाला नाही. राहून गेलेल्या अशा अनेक मुद्द्यांवर पुढील काळात चर्चा होत राहीलच. सविस्तर अवलोकनही होईल. मात्र तूर्तास तरी महायुती भरभक्कम आघाडी मिळाल्याचा आनंदोत्सव साजरा करत आहे. त्यांना शुभेच्छा देत पुढील पाच वर्षांमध्ये सुशासनाची अपेक्षा व्यक्त करूया. ▮

## रविवारची पत्रे

### ध्वज विजयाचा उंच धरा रे




महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीच्या रणांगणात नकारात्मक प्रचाराला सणसणीत उत्तर जनता जनार्दनाने दिले. संविधान बचावाची बोंब ठोकणाऱ्या अर्बन नक्षल्याचे पितळ उघडे पडले असून त्यांच्या नकारात्मक प्रचाराला जनतेने भीक घातली नाही. महाराष्ट्रात देव, देश आणि धर्माच्या रक्षणाकरिता जनतेने मतदान केले. लोकसभेच्या निवडणुकीत झालेला पराभवाचा प्रतिशोध महाराष्ट्राच्या जनतेने विधानसभेच्या निवडणुकीत घेतला आहे. राष्ट्रविरोधी शक्ती महाराष्ट्रात गाडण्यासाठी मनामनांत छत्रपती शिवरायांच्या भगव्या ध्वजाच्या रक्षणाकरिता, राष्ट्रभक्त संघटित शक्तीने देव, देश आणि धर्माच्या विचारांच्या विजयाकरिता अथक परिश्रम घेतले. हा विजय छत्रपती शिवरायांच्या मावळ्यांचा आहे. संविधान बचावचा अपप्रचार करणाऱ्यांना जनतेने उत्तर दिले असून संवैधानिक मार्गाने लोकशाही माध्यमातून महाराष्ट्राला प्रगतिपथावर घेऊन जाणाऱ्या समरसतेच्या विचाराचा विजय आहे.

भारताच्या विकासासाठी महाराष्ट्राचे योगदान अतिशय महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे देशाच्या कणखर नेतृत्वासोबत महाराष्ट्राची जनता उभी आहे हे विधानसभेच्या विजयाने सिद्ध केले आहे. ज्येष्ठांच्या आरोग्याची काळजी घेणारे, त्यांच्या तीर्थाटनाची जबाबदारी घेणारे, महाराष्ट्राच्या लाडक्या बहिणीला आर्थिक मदत करणारे, युवकांना रोजगारांसाठी प्रकल्प उभारणारे, राष्ट्रीय विचारांचा मानसन्मान करणाऱ्यांचा विजय झाला. महाराष्ट्रातील जिहादी मनसुब्यांना महाराष्ट्राच्या जनतेने धडा शिकवला. अफजल, औरंग्याच्या कबरीवर फुले उधळणाऱ्या जमातीचा पराभव झाला. छत्रपती शिवरायांच्या हिंदवी स्वराज्यात प्रगती करणाऱ्या महाराष्ट्राचा महाविजय झाला. विजयाचा ध्वज उंच धरून आनंदोत्सव साजरा करूया!

**अमोल तपासे**/नागपूर

### शाब्बास रे पठ्ठे

अखेर महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला व त्यात महायुतीला प्रचंड बहुमत मिळाले. महायुतीच्या या विजयाने हिंदू समाजाचा आनंद द्विगुणित झाला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना प. पू. डॉ. हेडगेवारांनी हिंदूंच्या संघटनासाठी, हिंदूंच्या विचारांसाठी, हक्कासाठी नागपुरात केली, त्या संघटनेला लवकरच शंभर वर्ष पूर्ण होत आहे व हा आनंदोत्सव साजरा करताना राज्यात हिंदू विचारांचे सरकार कार्यरत असणे हा एक योगायोगच म्हणावा लागेल. महायुतीचा हा विजय महाराष्ट्राला व देशाला वेगळी कलाटणी देणारा असून महाराष्ट्र हे देशातील एक अग्रेसर राज्य म्हणून पुढे येईल यात शंका नाही. या विजयासाठी भाजपाचे सर्व शीर्षस्थ नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

या निवडणुकीत महायुती विरोधकांचे लक्ष्य होतेच परंतु त्यात महाविकास आघाडीचे मुख्य लक्ष्य हे भाजपाचे चाणाक्ष देवेंद्र फडणवीस हेच होते. महाविकास आघाडीच्या प्रत्येक नेत्याने मनोज जरांगेसह देवेंद्र फडणवीसांवर वैयक्तिक व जातीय विखारी टीका केली. प्रत्येक पत्रकार परिषद देवेंद्र फडणवीसांचे नाव न घेता पूर्ण होऊ शकली नाही. परंतु त्यांनी न डगमगता संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला व विरोधकांना त्यांची जागा विरोधी पक्ष म्हणूनच राहील हे दाखवून दिले. म्हणूनच म्हणावेसे वाटते शाब्बास रे पठ्ठे, शाब्बास देवेंद्रजी. ▮

**शशिकांत दंडे**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# आ.प्रताप पाटील चिखलीकर यांना कॅबिनेट मंत्रीपद द्या : जीवन घोगरे पा.

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २४ नोव्हेंबर**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला अद्यापही नांदेड जिल्ह्यामध्ये मंत्रीपद दिले गेले नाही. नांदेड जिल्ह्यातून राष्ट्रवादीचे एकमेव आ.प्रताप पाटील चिखलीकर हे निवडूण आले आहेत. ते अभ्यासू व अष्टपैलू व्यक्तिमत्व असल्यामुळे त्यांना कॅबिनेट मंत्री बनवावे. अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नांदेड शहर जिल्हाध्यक्ष जीवन घोगरे पाटील यांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजितदादा पवार यांच्याकडे निवेदन देवून मागणी केली आहे.



राज्यामध्ये महायुतीला मोठे यश मिळाले असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवाराचाही मोठा विजय झाला आहे. नांदेड जिल्ह्यात लोहा, कंधार विधानसभा मतदारसंघातून आ.प्रताप पाटील चिखलीकर हे निवडूण आले आहेत. त्यांनी यापुर्वी खासदार म्हणून काम पाहिलेले आहे. अनेक वेळा आमदार म्हणूनही त्यांनी काम पाहिल्यामुळे त्यांना प्रदीर्घ अनुभव आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला अद्यापही मंत्रीपद मिळाले नाही. पक्षसंघठन वाढविण्यासाठी तसेच आगामी काळात होणार्या जिल्हा परिषद, महानगरपालिका, पंचायत समिती व ईतर स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये यश मिळविण्यासाठी आ.प्रताप पाटील चिखलीकर यांना मंत्रीपद मिळणे आवश्यक आहे. त्यांच्या माध्यमातून नांदेड जिल्ह्याला मंत्रीपद मिळावे अशी मागणी सर्व कार्यकर्ते व पदाधिकार्यांच्यावतीने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष अजितदादा पवार यांना निवेदन देवून केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा नवनिर्वाचित विधी मंडळाचे गटनेते अजितदादा पवार हे विधानसभा निवडणुकीमध्ये अधिक मताधिक्याने निवडून आल्याबद्दल त्यांचे अभिनंदनपर पुष्पगुच्छ देऊन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हाध्यक्ष नांदेड शहर जीवन घोगरे पाटील, जिल्हा उपाध्यक्ष नांदेड शहर माधव पाटील कदम शिरसीकर, जिल्हा सरचिटणीस गोविंद यादव, जिल्हाध्यक्ष नांदेड शहर सामाजिक न्याय विभाग ॲड.संघरत्न गायकवाड, ओबीसी सेल प्रदेश सरचिटणीस बच्छू यादव, युवक प्रदेश सरचिटणीस तेजबिंदर सिंग ढाकणीवाले, सामाजिक न्याय जिल्हाकार्याध्यक्ष नांदेड ॲड.भिमरत्न कांबळे, सामाजिक न्याय सरचिटणीस अनिल गायकवाड आदींची उपस्थिती होती.

# रमेश बोरनारे यांचा दणदणीत विजय
## वैजापुरकरांचा कौल विकास कामांना

वैजापूर : मतदारसंघात तीन हजार कोटींची विकासकामे केल्याचा अजेंडा घेऊन निवडणुकीत जनतेसमोर गेलेले शिवसेनेचे नेते व महायुतीचे उमेदवार रमेश पाटील बोरनारे यांनी दोन लाख ४३ हजार १७५ मतांपैकी तब्बल एक लाख ३३ हजार ६२७ म्हणजेच जवळपास ५५ टक्के मते मिळवुन दणदणीत विजय मिळवला. त्यांनी त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी व महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. दिनेश परदेशी यांचा ४१ हजार ६५८ मतांनी पराभव केला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे डॉ. दिनेश परदेशी यांना या निवडणुकीत ९१ हजार ९६९ मते मिळाली. अपक्ष उमेदवार एकनाथ जाधव यांना तिर्सय़ा क्रमांकाची ८ हजार २०५ मते मिळाली. या निवडणुकीत दोन लाख ४४ हजार ९९१ मतांपैकी दोन लाख ४३ हजार १७५ मते वैध ठरवण्यात आली. यात मतदान यंत्राद्वारे सुमारे दोन लाख ४१ हजार ६६८ व पोस्टल बॅलटद्वारे १५०७ अशी सुमारे दोन लाख ४३ हजार १७५ मतांचा समावेश आहे. १७२३ मते नोटाला पडली.



त्यामुळे वैजापुरच्या मतदारांनी विकासकामांना कौल दिल्याचे या निवडणुकीत स्पष्ट झाले आहे. निकाल घोषित होताच नागरिकांनी शहरात फटाक्यांची आतषबाजी करत दिवाळी साजरी केली. नवनियुक्त आमदार रमेश पाटील बोरनारे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केल्यानंतर वाहनातुन गुलालाची उधळण करत शिवसैनिक व नागरिकांनी मिरवणुक काढली. त्यामुळे संपुर्ण शहरात जल्लोषाचे वातावरण होते. त्यानंतर विजयी उमेदवार रमेश पाटील बोरनारे यांनी विनायकराव पाटील महाविद्यालयात जाऊन निवडणुक निर्णय अधिकार्य़ांच्या हस्ते प्रमाणपत्र स्वीकारले.

सकाळी आठ वाजता येथील विनायकराव पाटील महाविद्यालयात निवडणुक निरीक्षक अभयकुमार पाण्डेय, निवडणुक निर्णय अधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड, सहायक निवडणुक निर्णय अधिकारी सुनील सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली चौदा टेबलवर मतमोजणीस सुरुवात झाली. दुपारी दोन वाजेपर्यंत सर्व निकाल हाती आले होते. या निवडणुकीत शिवसेनेचे रमेश बोरनारे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे डॉ. दिनेश परदेशी यांच्यात अटीतटीचा सामना झाल्याने ही निवडणुक दोघांसाठीही खुप प्रतिष्ठेची झाली होती. त्यामुळे विजयी उमेदवार थोड्या फरकाने विजयी होईल असा तर्क राजकिय विश्लेषकांनी व्यक्त केला होता. मात्र या निकालाने सर्वांचे अंदाज फोल ठरवत अनपेक्षित निकाल दिला. मतमोजणीच्या पहिल्या फेरीपासुन शिवसेनेचे उमेदवार रमेश बोरनारे यांची मतांची आघाडी कायम राहीली.पहिल्या फेरीत बोरनारे यांनी १५३० मतांची आघाडी घेतली.

# नाईक यांना दुसऱ्यांदा धुळ चारत किनवट विधानसभेत बाजी मारलेले आ.केराम यांना उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी मंत्रिपद देऊन न्याय द्यावा : जनतेची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. २४ नोव्हेंबर**

बरं झालं कमळाचा सुगंध दरवळला आणि तुतारीचा आवाज नाही घुमला. कारण, एवढ्या मोठ्या संख्येने निवडून आलेल्या महायुतीच्या कमळाच्या सुगंधापुढे, भेदक धनुष्यबाणासमोर आणि इंग्रजीतील त आकारात अचुक टायमिंग साधणारी घड्याळ अशा मोठ्या वरातींच्या जमावापुढे एकटा (इतरही काही निवडून आलेत) प्रदीप नाईक तुतारी वाजवून काय या तालुक्याचा विकास करणार होता.ही बोलकी प्रतिक्रिया आहे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार प्रदीप नाईक हे किनवट विधानसभा निवडणुकीत महायुतीचे भाजपाचे उमेदवार आमदार भीमराव केराम यांच्या विरोधात सलग दुसऱ्यांदा आपटल्यानंतर तुतारी समर्थकांची.

जे आजकालच्या राजकारणात प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने वागतात त्यांच्यासाठी हे बोध घेण्यासारखे असून,यावरून एक स्पष्ट होते कि,किनवट विधानसभेत महायुतीचे भाजपाचे नवनिर्वाचित आमदार भीमराव केराम यांच्याकडून त्यांच्या अपेक्षा आता निश्चितच वाढलेल्या असून,या निवडणुकीत मते दिलेल्याच नव्हे तर विरोधात मतदान केलेल्या मतदार जनतेच्या मनात देखील केराम यांना आता या भागाचे भाग्यविधाते बनविण्यासाठी राज्याच्या नविन मंत्रिमंडळात एखादे विभागाचे मंत्रीपद देण्यात यावे अशी सुप्त नाही तर उघडच इच्छा आहे.

नांदेड जिल्ह्याच्या टोकावर व तेलंगणाच्या सिमेवर वसलेल्या आजपर्यंत मंत्रीपदापासून वंचित असलेल्या किंवा/माहूर विधानसभा निवडणुक २०२४ मध्ये निवडून आलेल्या महायुतीच्या भाजपाचे उमेदवार आमदार भीमराव केराम यांनी २०१९ व २०२४ अशा सलग दोन निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार प्रदीप नाईक यांना दोनदा धुळ चारली.आणि जो उमेदवार



सलग दुसऱ्यांदा निवडून येण्याचा बहुमान पटकावतो तो इतरांपेक्षा वेगळा व त्या मतदारसंघातील जनतेच्या मनातील ताईत बनलेला असतो.अशा लोकप्रिय आणि विकासपुरुष आमदाराला या भागाचा वर्षिन्नूषाचा विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी केवळ आमदार निधीवरच अवलंबून न ठेवता मोठं काम करुन या आदिवासी बहुल मतदारसंघातील भाग्यविधाते बनविण्यासाठी राज्याच्या विधानसभेत एखादे विभागाचे मंत्रीपद देऊन गौरविण्यात आले तर हा त्यांचा खरा गौरव आणि या मागासलेल्या ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेला दिलेला खरा न्याय ठरणार आहे.भाजपकडून विधानसभा निवडणुकीत घवघवीत यश मिळविण्यासाठी सिंहांचा वाटा उचलेले उपमुख्यमंत्री व भावी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आ.भीमराव केराम यांना आदिवासी विकास अथवा इतर एखाद्या विभागाचे मंत्रिपद देऊन किनवट मतदारसंघास न्याय द्यावा अशी मागणी येथील जनतेतून होत आहे. विकासापासून वंचित असल्याकारणाने साधारण तीन वर्षापूर्वी किनवट व माहूर तालुके शेजारच्या तेलंगणा राज्यात समाविष्ट करण्याची मागणी जोर धरू लागली होती ती नंतर आ.भीमराव केराम यांनी या मतदारसंघात जवळपास

२५०० कोटींचा विकास निधी खेचून आणत विविध विकास कामे केल्यानंतर हळूहळू शांत झाली.निवडणुक प्रचारात देखील आ. केराम यांनी किनवटचा सर्वांगीण विकास करण्यासाठी व नांदेड जिल्हा मुख्यालयात पासून तब्बल २००किलोमिटर दुर अंतरावर असलेल्या या किनवट तालुक्यातील जनतेचा वेळ व पैसा वाचवण्यासाठी त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी किनवटला जिल्हा घोषित करण्याची मागणी किनवट येथील एका प्रचार सभेत भाषण करताना उमेदवार आमदार भीमराव केराम यांनी दस्तुरखुद्द उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली होती.हे या ठिकाणी विशेष नमुद करण्यासारखे आहे. इस्लापूर व मांडवी तालुक्याची नवनिर्मिती,चिमटा धरण , रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी बंद पडलेला साखर कारखाना, उद्योगधंद्यांना चालना देण्यासाठी नविन उद्योग, कारखाने आदींची उभारणी या सर्व बाबींची पूर्तता करण्यासाठी आता नवनिर्वाचित अध्यक्ष आमदार भीमराव केराम यांना राज्यमंत्री मंडळात एखादे मंत्रीपद देण्याची हीच खरी वेळ असून,जर या भागावर कायम निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित करायचे असेल तर भाजपाला यापेक्षा अधिक संधी पुन्हा उपलब्ध होणार नसल्याने या संधीचा लाभ केराम यांनी उचलने अतीशय गरजेचे आहे.संधीचे सोने करून घेण्यासाठी जनतेने केराम यांना पुन्हा एकदा संधी दिली असून, भाजपा पक्षश्रेष्ठी, वरिष्ठ नेते व सर्वेसर्वा उपमुख्यमंत्री व भावी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ती जातीने लक्ष घालून उपलब्ध करून देण्याची गरज यानिमित्ताने निर्माण झाली आहे.

# महायुतीने इव्हीएम मशीनचा गैरवापर करीत विजय मिळवला आहे : कॉ. प्रा. सदाशिव भुयारे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २४ नोव्हेंबर**

महाराष्ट्रातील भाजप, शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट व त्यांचे मित्र पक्ष मिळून महायुतीची स्थापना करत सत्ता भोगली असून महायुतीच्या सत्ता कालखंडात शेतकरी, शेतमजूर, विध्यार्थी, बेरोजगार, अल्पभूधारक, छोटे व्यवसायिक, लहान कारागीर निराधार, महिला, अपंग वृद्ध सामान्य जनतेसाठी ठोस अश्या कोणत्याही विकासात्मक भूमिका महायुती सरकारने घेतलेला नाहीत उलट, कंत्राटी नोकरभरती करीत जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत भरमसाठ वाढ करून महाराष्ट्रातील जनतेची प्रचंड मोठा लूट केली आहे.



महायुतीला त्यांचा पराभव होणार हे लक्षात आल्यानंतर त्यांनी गुजरात येथील एका खाजगी कंपनीकडून इव्हीएम मशीन मागविल्या व प्रशासकीय यंत्रणेस हाताशी धरून त्यात महायुतीच्या उमेदवारास विजयासाठी आवश्यक तेवढी मते इतर उमेदवाराच्या खात्यातून परस्पर वर्ग करीत एक्झिट पोलचे सर्व दावे खोटे ठरवत प्रचंड मोठा विजय मिळवला आहे. हा विजय भाजप, शिंदे गट आणि अजित पवार गटाचा नसून हा महाविजय इव्हीएम मशीनचा गैरवापर करीत महायुतीने मिळवलेला विजय असल्याचे प्रतिपादन अण्णाभाऊवादी कम्युनिस्ट पार्टीचे राष्ट्रीय जनरल सेक्रेटरी तथा ८६ नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार कॉ. प्रा. सदाशिव भुयारे यांनी एका प्रसिद्धी पत्रिकाद्वारे दिला आहे.

# नांदेड लोकसभेची सहानुभूतीची लाट परतवून लावण्यात भाजपा असमर्थ

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २४ नोव्हेंबर :** अखेरच्या क्षणा पर्यंत अत्यंत अटीतटीच्या झालेल्या नांदेड लोकसभा पोट निवडणुकीच्या निकालात काँग्रेसचे रवींद्र वसंतराव चव्हाणांचा या वेळी निसटता विजय झाला असून पहिल्या फेरीपासून आघाडीवर राहिलेले भा. ज.पाचे डॉ. संतुकराव हंबर्डे यांचा त्यांनी फेर मतमोजणीत अवघ्या १४५७ मतांनी पराभव केला आहे अशी चर्चा सुरू असतानाच राज्यातील सार्वत्रिक विधानसभेच्या निवडणुकीत संपूर्ण राज्यात महा युतीने महाविकास आघाडीचा सुपडासाफ केला असतानाच आणि नांदेड जिल्ह्यातही महायुतीचा डंका सुरु असताना अत्यंत प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीत मात्र महाविकास आघाडीचे प्रा. रवींद्र चव्हाण यांनी अखेरच्या क्षणी बाजी मारून महायुतीच्या जल्लोषावर महाविकास आघाडीच्या विजयाने विरजन टाकले. प्रा. रवींद्र चव्हाणांच्या या विजयानंतर यावेळी संपूर्ण जिल्ह्यात अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे कट्टर समर्थकांकडून फटाके फोडून जल्लोष केला.

# महायुतीचे प्रतापराव पाटील चिखलीकर १० हजार ९७३ मताधिक्याने विजयी; ओबीसी उमेदवार तिसऱ्या क्रमांकावर

**तभा वृत्तसेवा**
**लोहा ,दि. २४ नोव्हेंबर**

लोहा कंधार मतदारसंघातील झालेल्या मतदानाची मतमोजणी शनिवारी सकाळी तहसील कार्यालयात १४ टेबलवर २५ फेऱ्या मध्ये करण्यात आली यावेळी झालेल्या २ लक्ष २६ हजार ८३७ मतांची २५ व्या फेरीपर्यत महायुती राष्ट्रवादी अजित पवार गटाचे उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर व महाविकास आघाडीचे उबाटा गटाचे उमेदवार एकनाथ दादा पवार यांच्यात अटीतटीची लढत झाली. अटीतटीच्या लढतीत अखेर महायुतीचे उमेदवार प्रतापराव पाटील यांनी १० हजार ९७३ मताधिक्य घेऊन विजय मिळवला. लोहा कंधार येथील विधानसभा निवडणूक ही मराठा विरुद्ध ओबीसी बहुजन अशी झाली होती यामुळे या मतदारसंघातील लढतीकडे जिल्ह्याचे लक्ष केंद्रित झाले होते. या जातीच्या समीकरणात मराठा मतदार निवडणुकीत एकजुटीने मराठा उमेदवाराच्या बाजूने असल्याचे दिसून आले परंतु ओबीसी बहुजन मतदानाची संख्या अधिक असताना ही मतदार ओबीसी उमेदवाराच्या बाजूने एकवटला नाही तर ओबीसी बहुजन मतदारांचे विभाजन झाल्याचे निकालावरून दिसून आले.

मतमोजणीत उमेदवारांना मिळालेली मते प्रतापराव पाटील चिखलीकर एकूण मते ७२७५० तर महाविकास आघाडीचे उमेदवार एकनाथ दादा पवार यांना ६१७७७ मते मिळाली. प्रतापराव पाटील हे १० हजार ९७३ मताधिक्य घेऊन विजयी झाले आहेत. या अटीतटीच्या लढतीत एकनाथ दादा पवार यांचा पराभव झाला दुसऱ्या क्रमांकावर राहिले तर या निवडणुकीत नव्याने रिंगणात निवडणूक बॅट निशाणीवर लढविलेले चंद्रसेन सुरनर यांना २९ हजार १९४ मते मिळाली तिसऱ्या क्रमांकावर आहेत .सेवाजन शक्ति पार्टीचे उमेदवार प्रा मनोहर धोंडे यांना या निवडणुकीत २० हजार ६४३ मतांचा आकडा गाठता आला तर गत निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीकडून निवडणूक लढवणारे शिवाभाऊ नरंगले याना ३९ हजार मते मिळाली होती मात्र या निवडणुकीत ते पाचव्या नंबर वर गेले त्यांना २० हजार ३०२ मते मिळाली. या निवडणुकीत शेकापचे विद्येमान आमदार असलेले श्यामसुंदर शिंदे यांच्या पत्नी सौ अशाबाई शामसुंदर शिंदे यांना मात्र केवळ १९ हजार ७८६ मताचा गाडा थांबला. नोटा ला १०८२ मतदारांनी पसंती दिली. निवडणुकीत एकूण १४ उमेदवार निवडणूकीत नशीब आजमवित होते.

प्रतापराव पाटील चिखलीकर ७२७५०, एकनाथ पवार ६१७७७, चंद्रसेन सुरनर २९१९४, मनोहर धोंडे २०६४३, शिवकुमार नरंगले २०३०२, अशाबाई शिंदे १९७८६, एकनाथ पवार डमी नाव असलेले उमेदवार ८७१, बालाजी चुकलवाड ८३५, सुभाष कोल्हे ५८०, पंडित वाघमारे ५६७, आशा शिंदे डमी उमेदवार सारखे नाव असलेली उमेदवार ४०३, नोटा १०८२मते मिळाली आहेत. पोष्टल मतांतून प्रतापराव पाटील यांना सर्वाधिक पसंती देत ३१८८ मतांपैकी ८७३ मते मिळाली तर एकनाथ पवार यांना ७८६ मते मिळाली, चंद्रसेन सुरनर यांना ४११, धोंडे मनोहर ३७५, शिवा नरंगले २२६ आशाताई शिंदे १८९ या मतांचा समावेश आहे. ए. व्हि.एम. मशीन वर आक्षेप सोडत काढून पाच ए.व्हि.एम. मशीनची फेर मतमोजणी करण्याची मागणी उमेदवार प्रा मनोहर धोंडे व चंद्रसेन सुरनर यांनी आक्षेप घेतला होता, त्यामुळे काही काळ मतमोजणी केंद्रात गोधळ झाला परंतु फेऱ्याची मतमोजणी संपल्यानंतर आक्षेप घेतलेल्या ३३८ केंद्रातील ए व्ही मशीन ची सोडत काढून पाच एव्ही मशीनची मतमोजणी फेर करण्यात आली. मतमोजणी दरम्यान मतदान केंद्राच्या बाहेर दोन राजकीय उमेदवाराच्या गटात बाचाबाची झाली या दरम्यान दगफेक करण्यात आली पोलिसांनी लाठी चा वापर करून जमाव पांगवण्यासाठी प्रयत्न केले यावेळी कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मतमोजणी केंद्राला पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी भेट देऊन परिस्थिती ची पहाणी केली.

# अब्दुल सत्तार विजयी होताच कार्यकर्त्यांचा जल्लोष



सिल्लोड प्रतिनिधी : शिवसेना नेते अब्दुल सत्तार यांचा विजय होताच कार्यकर्त्यांच्या वतीने एकच जल्लोष करण्यात आला. एकमेकांना पेढे, लाडू भरवत कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी फुलांनी सजविलेल्या वाहनातून अब्दुल सत्तार यांनी शुभेच्छा स्वीकारल्या. यावेळी अर्जुन पाटील गाढे, अब्दुल समीर अ. सत्तार, श्रीराम पा. महाजन , विनोद मंडलेचा, अब्दुल आमेर, रामदास पालोदकर, दामू अण्णा गव्हाणे, नंदकिशोर सहारे, राजेंद्र ठोंबरे,सुधाकर पाटील ,नरेंद्र बापू पाटील, सुदर्शन अग्रवाल, अकील वसईकर, किशोर अग्रवाल, रमेश साळवे, रउफ बागवान, राहुल सपकाळ, रईस मुजावर, प्रशांत क्षीरसागर, आसिफ बागवान, हनिफ मुलतानी शेख मोईज यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# दया सीआयडीमध्ये परतला

छत्रपती संभाजीनगर - दोन दशकांपेक्षा जास्त काळापासून लोकांचे मन काबिज करणारे सुपरिचित कलाकार शिवाजी साटम (ए सि पी प्रद्युमन), दयानंद शेट्टी (दया) आणि आदित्य श्रीवास्तव (अभिजीत) पुन्हा एकदा एकत्र येत आहेत आणि २१ डिसेंबरपासून सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजनवर CID ची धमाकेदार सुरुवात होत आहे.

## टीसी हरवली


**लक्ष्मण अशोक गाडे रा. वडवाळी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर हे नाथ हायस्कूल पैठण येथून मार्च २०२० ला विज्ञान शाखेत उत्तीर्ण झाले असून त्यांचा मूळ टीसी पैठण बस स्टँड परिसरात गहाळ झाला आहे. हा टीसी सापडल्यास ७०३८९८९३११ या मोबाईल नंबर वर संपर्क करावा.**

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते होणार आयसीए जागतिक सहकारी परिषदेचे उदघाटन
## इफको आणि आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेचा सहभाग

नवी दिल्ली: सन्माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी २०२५ चे संयुक्त राष्ट्र आंतरराष्ट्रीय सहकारी वर्ष लाँच करतील, अशी घोषणा भारत सरकारच्या सहकार मंत्रालयाची इफको लिमिटेड आणि आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना यांच्या संयुक्त पत्रकार परिषदेत करण्यात आली.

आंतरराष्ट्रीय सहकारी आघाडीच्या (आयसीए) १३० वर्षांच्या इतिहासात इफकोच्या पुढाकाराने या जागतिक सहकार चळवळीच्या आयसीए महासभेचे आणि जागतिक सहकारी परिषदेचे आयोजन प्रथमच भारतात करण्यात आले आहे.

भारत सरकारच्या सहकार मंत्रालयाचे सचिव डॉ. अशिष कुमार भूतानी यांनी सांगितले की,



सन्माननीय सहकार मंत्री अमित शाह २५ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी ३ वाजता या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. ते जागतिक सहकारी परिषदेच्या उद्घाटन सत्राचे अध्यक्ष आणि मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहतील. या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय सहकारी वर्षा - २०२५ निमित्त स्मरणीय टपाल तिकिटाचे अनावरणही करण्यात येईल.

इफको लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. यू. एस. अवस्थी यांनी पत्रकारांना माहिती दिली की, भूतानचे सन्माननीय पंतप्रधान महामहिम दशो त्शेरिंग तोबगे जी आणि फिजीचे सन्माननीय उपपंतप्रधान महामहिम मानोआ कामिकामिका हेही या कार्यक्रमाला मान्यवर पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

त्यांनी पत्रकारांना सांगितले की, हा कार्यक्रम २५ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२४ या कालावधीत भारत मंडपम, आयटीपीओ, प्रगती मैदान, नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आला आहे. 'सहकारी संस्था सर्वांसाठी समृद्धी निर्माण करतात' ही या कार्यक्रमाची संकल्पना आहे. या कार्यक्रमात २०२५ च्या रॉचडेल पायोनियर्स पुरस्कारांचे वितरणही करण्यात येणार आहे. सहकारी संस्थांच्या विकासासाठी आणि आंतरराष्ट्रीय सहकारी चळवळ मजबूत करण्यासाठी बहुमूल्य योगदान देणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांना हे पुरस्कार देण्यात येतात.

इफको लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. यू. एस. अवस्थी म्हणाले, सहकारी संस्था सर्वांसाठी समृद्धी निर्माण करतात, ही या परिषदेची संकल्पना आहे. एक समृद्ध आणि सुरक्षित सहकारी चळवळ उभारणे, हे आमचे दीर्घकालीन उद्दिष्ट आहे. विचारांच्या देवाणघेवाणीसाठी आंतरराष्ट्रीय अभ्यागतांचे स्वागत करता येणे हा आम्ही आमचा बहुमान समजतो.

**कार्यालय हिंगोली नगर परिषद हिंगोली, जि.हिंगोली**
फोन नं. (०२४५६) २२१७२७, फैक्स नं. (०२४५६) २२१७२७,
E-Mail-coud.hingoli@maharashtra.gov.in
विभाग : कर विभाग जा.क्र./न.पा./३१०९/२०२४ दिनांक २१-११-२०२४

**जाहीर नोटीस**
**(महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी १९६५ चे कलम ११८ व ११९ अन्वये)**

ज्याअर्थी हिंगोली नगरपरिषदेने सन २०२४-२५ ते २०२७-२८ या चतुर्थवार्षिक वर्षाकरिता हिंगोली नगरपरिषद क्षेत्रातील इमारती/भूखंडाचे कर निर्धारणासाठी करमुल्यांकन याद्या वॉर्डनिहाय तयार करून महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११७ अन्वये मुल्यानिर्धारण अधिकारी हिंगोली नगरपरिषद तथा नगररचनाकार, हिंगोली यांनी सदर याद्या तपासणी करून पाठविलेल्या आहेत, त्याअर्थी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्यागिक नगरी, अधिनियम १९६५ चे कलम ११८ नुसार हिंगोली क्षेत्रातील एकूण ८ प्रभागाचे कर निर्धारण करण्यात आलेल्या करमुल्यांकनाच्या याद्यांची प्राथमिक प्रसिध्दी दिनांक २५/११/२०२४ रोजी करण्यात येत आहे. सदर करमुल्यांकन याद्या नागरीकांना तपासणीकरीता हिंगोली नगरपरिषद कर विभागात कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळता उपलब्ध असतील.

तसेच महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११९ नुसार सर्व मालमत्ताधारकांना सूचना नोटीस देण्यात येतील, ज्या मालमत्ताधारकांना सुचना नोटीस प्राप्त झाल्या नाहीत, त्यांनी नगरपरिषद कार्यालयातील कर विभागातून प्राप्त करून घ्याव्यात, अन्यथा जाहीर प्रसिध्दी पत्रकच नोटीस समजण्यात यावी. सदर यादीतील नोंदीबाबत ज्या मालमत्ताधारकांस/भोगवटादारास आक्षेप अर्ज नोंदवायचा आहे त्यांनी दि. २५/११/२०२४ ते दि.२४/१२/२०२४ या कालावधीत नगर परिषद कार्यालयातील कर विभागात सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० या कार्यालयीन वेळेत सादर करावा, मुदतीनंतर आलेले आक्षेप अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, तसेच आक्षेप अर्ज नसलेल्या व मुदतीनंतर आक्षेप अर्ज सादर केलेल्या मालमत्ताधारकांना करनिर्धारण मान्य आहे, समजण्यात येईल, याची नोंद घ्यावी,

(टीपः नागरीकांना आक्षेप नमुना अर्ज नगर परिषद कार्यालयामधील कर विभागात मिळेल, आक्षेप अर्जा सोबत नगर परिषदचे थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. याशिवाय आक्षेप अर्ज स्विकारला जाणार नाही, नागरिकांना आक्षेप घेताना अर्ज घेता येईल, वृक्ष, कर रोजगारहमी उपकर, शिक्षण कर, अग्नीशमन कर, स्वच्छता व आरोग्य उपविधी कर या कराचे दर शासनाने निश्चित केले असल्यामुळे शासन निर्णयानुसार / परिपत्रका नुसार लावण्यात आलेले आहे, करिता यावर आक्षेप घेण्यात येऊ नये, याची नोंद घ्यावी)

**(स्वाक्षरीत/-)**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, हिंगोली**

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# नांदेडात महायुतीचा विजय !



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २३ नोव्हेंबर**

काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळख असलेल्या नांदेड जिल्ह्यात भाजपा शिवसेना महायुतीने जोरदार मुसंडी मारली असून नांदेड जिल्ह्यातील नऊ विधानसभेत महायुतीचा उमेदवार विजयी झाला आहे तर लोकसभा पोटनिवडणुकीत देखील भाजपा-महायुतीने बाजी मारली असल्याने नांदेड जिल्हा आता महायुतीचा गड बनला आहे.

लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभेची मतमोजणी आज स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व लोहा, किनवट, हदगाव आदी ठिकाणी पार पडली. दुपारी पाच वाजेपर्यंत जवळपास सर्वच निकाल हाती आले. यात नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीत रवींद्र चव्हाण यांचा पराभव करत डॉ. संतुक हंबर्डे यांनी दणदणीत विजय मिळवला. तर मुखेड मतदार संघात भाजपा महायुतीचे आ. डॉ. तुषार राठोड, देगलूर आ. जितेश अंतापूरकर, भोकर श्रीजया चव्हाण, किनवट भीमराव केराम लोहा प्रताप पाटील चिखलीकर, नायगाव राजेश पवार, हदगाव बाबुराव कदम, नांदेड उत्तर बालाजी कल्याणकर तर नांदेड दक्षिण मधून आनंद बोंढारकर हे काठावर विजयी झाले. केवळ ६०० मतांनी बोंढारकर विजयी झाले. नांदेड लोकसभेच्या मतमोजणीत सुरुवातीपासूनच डॉ. संतुक हंबर्डे आघाडीवर होते. शेवटच्या फेरीपर्यंत त्यांनी आघाडी कायम ठेवली. त्याचबरोबर मुखेड मधून डॉ. तुषार राठोड, नायगाव मधून राजेश पवार, हदगाव मधून बाबुराव कदम तर नांदेड उत्तर मधून बालाज



कल्याणकर हे पहिल्या फेरीपासून आघाडीवर होते. किनवट मतदार संघात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदीप नाईक हे १५ ते १६ व्या फेरी पर्यंत आघाडीवर गेले होते परंतु त्यानंतर मात्र भीमराव केराम यांनी तर नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे मोहन हंबर्डे हे सुरुवातीपासून आघाडीवर होते परंतु आनंद बोंढारकर यांनी आघाडी घेत केवळ ६०० मतांनी निसटता विजय मिळवला. दरम्यान काँग्रेसने आरोप केल्यानंतर नांदेड दक्षिण व नांदेड लोकसभा मतदानाची पुर्नमतमोजणी वृत लिहीपर्यंत सुरु होती.

**तरुण भारतचा अंदाज ठरला खरा**

मतमोजणीपूर्वीच दैनिक तरुण भारतने नांदेड जिल्ह्यातील लोकसभा व विधानसभातील संभाव्य विजेत्या उमेदवाराबाबत वृत्त प्रकाशित केले होते. हदगाव विधानसभा व नांदेड दक्षिण विधानसभेचा अपवाद वगळता अन्य लोकसभा पोटनिवडणुक व विधानसभेत निवडून येणाऱ्या उमेदवाराचा तरूण भारतचा अंदाज तंतोतंत खरा ठरला आहे.

**लाडक्या मुस्लिम बहिणींनी दिली महायुतीला साथ**

नांदेड उत्तर आणि दक्षिण मतदारसंघात काँग्रेसकडून अब्दुल सत्तार तर वंचित बहुजन आघाडी करून फारुख अहेमद हे मुस्लिम उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे होते. मुस्लिम मतदारांची संख्या पाहता यावेळी नांदेड दक्षिणमधून फारुख अहेमद तर उत्तर मधून अब्दुल सत्तार निवडून येतील अशी शक्यता होती. परंतु लाडक्या मुस्लिम महिलांनी यावेळी महायुतीलाच साथ दिल्याचे निदर्शनास आले . मतमोजणी प्रक्रियेच्या शेवटच्या दिवसापर्यंत विजयाची चर्चा असलेल्या या दोन्ही उमेदवारांना मात्र पराभव स्वीकारावा लागला.

**ऐतिहासिक विजय: खा. अशोक चव्हाण**

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांचे मार्गदर्शन केले. तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे नेतृत्व, भाजपचे निवडणूक प्रभारी भुपेंद्र यादव व अश्विनी वैष्णव यांचे नियोजन होते. तसेच असंख्य कार्यकर्त्यांची मेहनत आणि लोकांचे आशीर्वाद यातून महायुतीचा महाविजय साकारला. महायुती सरकारने केलेली कामे, लाडकी बहिण, युवा कार्यप्रशिक्षण, शेतकरी मोफत वीज सारख्या योजनांना लोकांचे पाठबळ मिळाल्याने हा विजय झाला, अशी प्रतिक्रिया भाजप खा. अशोक चव्हाण यांनी दिली.



## श्रीलंकेच्या शिक्षणमंत्र्यांनी केला रमिंदर कौर मोदी यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २३ नोव्हेंबर**



भारतातील प्रतिष्ठित शिक्षणतज्ञ रमिंदर कौर मोदी यांना नुकतेच श्रीलंकेच्या शिक्षण मंत्रालयाने विद्यार्थी गुणवत्ता मंडळ २०२४ च्या राष्ट्रीय अधिवेशनात प्रमुख वक्ते म्हणून आमंत्रित केले होते. या प्रतिष्ठित कार्यक्रमाचे उद्दिष्ट शिक्षणातील उत्कृष्टतेला प्रोत्साहन देणे आणि संस्कृतीला प्रोत्साहन देणे हा आहे.

सीबीएसई प्राचार्या आणि शिक्षक प्रशिक्षक म्हणून वीस वर्षांपेक्षा जास्त अनुभव असलेल्या रमिंदर कौर मोदी यांनी आपले ज्ञान आणि कौशल्य या अधिवेशनात मांडले. त्यांच्या संबोधनात विद्यार्थ्यांचे शिक्षण परिणाम वाढवण्यासाठी गंभीर विचारांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि आवश्यक जीवन कौशल्ये विकसित करण्यासाठी नाविन्यपूर्ण धोरणांवर लक्ष केंद्रित केले.

श्रीलंकेच्या सबरागामुवा प्रांताच्या राज्यपाल श्रीमती चंपा जानकी राजरत्ने यांनी रमिंदर कौर मोदी यांचा शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल गौरव केला. ही ओळख म्हणजे शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या पूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचण्यासाठी त्यांच्या अथक प्रयत्नांचा दाखला आहे.

दि. ५ नोव्हेंबर ते ७ नोव्हेंबर दरम्यान त्यांच्या भेटीचा एक भाग म्हणून रमिंदर कौर मोदी यांनी श्रीलंकेतील विविध सरकारी शाळांमधील शिक्षकांसाठी प्रशिक्षण सत्रेही घेतली. या परस्परसंवादी सत्रांमध्ये प्रभावी अध्यापन पद्धती, वर्ग व्यवस्थापन आणि विद्यार्थ्यांचे मूल्यमापन तंत्र यावर लक्ष केंद्रित केले गेले. अधिक आकर्षक आणि सर्वसमावेशक शिक्षण वातावरण तयार करण्यासाठी शिक्षकांना आवश्यक कौशल्ये आणि ज्ञानाने सुसज्ज करणे हे प्रशिक्षणाचे उद्दिष्ट आहे.

रमिंदर कौर मोदी यांचा श्रीलंका दौरा हा देशाच्या शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करण्याच्या प्रयत्नांमध्ये एक महत्त्वाचा टप्पा ठरला. त्यांच्या कौशल्य आणि अंतर्दृष्टीने शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या वाढीसाठी आणि विकासाला हातभार लावला आहे.

## संक्षिप्त वृत्त

### इस्लापूर येथे अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यास सुरुवात

**इस्लापूर**-इस्लापूर येथे ग्रंथ राज ज्ञानेश्वरी पारायण व हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, या सप्ताह सोहळ्याची सुरुवात २२ शुक्रवार पासून झाली आहे २९ शुक्रवारला या भक्तीमय सोहळ्याची सांगता होणार आहे. २२ शुक्रवार पासून प्रारंभ झाला असलेल्या सप्ताह सोहळ्यात सकाळी ४ ते ६ काकडा भजन, ६ ते ९ ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी १० ते ११ गाथा भजन, दुपारी १ ते ५ संगीतमय भागवत कथा हभप. जगदिशानंदजी महाराज शास्त्री आळंदी देवाची हे सादर करणार आहेत. तर ज्ञानेश्वरी व्यासपीठ हभप ज्ञानेश्वर महाराज बोरगडीकर हे सांभाळणार आहेत. तर कलशपुजन योगेश आनंदराव पाटील यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. रात्री ८ ते १० या वेळेत हरी किर्तन सादर होणार असून, या मध्ये शुक्रवारी हभप बालकिर्तनकार ओम महाराज आळंदी, शनिवार हभप प्रविण महाराज आळंदीकर, रविवार हभप राम महाराज पांगरेकर महाराज मुंबई, सोमवार हभप साध्वी महंत मुक्ताईनाथ माऊली टाकराळेकर, मंगळवार हभप माऊली महाराज पुंगळकर धामनगावकर, बुधवार हभप पंजाब महाराज चालगणीकर, गुरुवार हभप तुकाराम महाराज पारधे हे आदी किर्तन रूपी सेवा देणार असून पारधे महाराज शुक्रवार ला काल्याचे कीर्तन सादर करणार असून, दीपोत्सव व काल्याचे कीर्तन व महाप्रसादाने या भक्तीमय सोहळ्याची सांगता होणार आहे. या अश्या भव्यदिव्य भक्तीमय सोहळ्याचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे अवाहन समस्त इस्लापूर गाव वासीयांकडून करण्यात आले आहे.



नांदेड-भोकर विधानसभा मतदारसंघातून एडव्होकेट श्रीजया चव्हाण यांनी दणदणीत विजय मिळविला त्यावेळी त्यांचे अभिनंदन करताना भाजपचे प्रवक्ते संतोष पांडागळे

## मुदखेड मध्ये भाजपा कार्यकर्त्यांचा फटाक्याची अतिषबाजी करून जलोष साजरा

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. २३ नोव्हेंबर**

भोकर विधानसभा मतदारसंघातून भाजपाच्या श्रीजया अशोक चव्हाण यांचा विजय झाल्यानंतर मुदखेड शहरात भाजप कार्यकर्त्यांनी ढोल, ताशांच्या गजरात फटाके फोडून जलोष साजरा करण्यात आला. भोकर मतदारसंघ हा काँग्रेस पक्षाचा गड मानला जात होता पण तो गड आता भाजपने हातात घेतला आहे.

या भोकर विधानसभा निवडणुकीत खा.अशोक चव्हाण यांची कन्या श्रीजया अशोक चव्हाण तर काँग्रेस कडून तिरुपती उर्फ पप्पू पाटील कोंडेकर या दोघांची अशी दुहेरी लढत होती या लढतीमध्ये भाजपच्या श्रीजया अशोक चव्हाण यांनी तिरुपती कोंडेकर यांचा पराभव करीत ४९६७१ मतांनी विजयी झाल्या आहेत. भोकर मतदारसंघातील मतदारांनी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्यावर विश्वास ठेऊन त्यांच्या मुलीला भरघोस मतांनी विजयी करून त्यांना भोकर मतदारसंघाचा विकास



करण्याची संधी दिली आहे. अँड श्रीजया अशोक चव्हाण या विजयी होताच मुदखेड शहरातील भाजप युवक कार्यकर्त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या फालकास पुष्पहार अर्पण करून विजयाचा जलोष साजरा केला.

श्रीजया चव्हाण यांच्या विजयाचा जलोष माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचे विश्वासू कार्यकर्ते उत्तमराव चव्हाण,रामसिंग चव्हाण, संजय आऊवार, अमोल आबादर, ऋषिकेश पारवेकर, राजू भाऊ बारतोंडे, सुशील मुंगल,रावसाहेब चौदंते, शैलेश बोडके, अभिजीत नातेवाड,शैलेश गुडमलवाड, यांच्यासह आदी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## किनवटमध्ये महायुतीचे भीमराव केराम यांचा दुसऱ्यांदा ऐतिहासिक विजय

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. २३ नोव्हेंबर**

८३ किनवट विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीचे निकाल २३ नोव्हेंबर रोजी घोषित झाले असून महायुतीचे उमेदवार भीमराव केराम यांनी ९२०२८ इतके मतदान घेऊन दुसऱ्यांदा ऐतिहासिक विजय मिळविला आहे.या विजयाचा सर्वत्र जल्लोष साजरा करण्यात आला असून यावेळेला महायुतीसरकार मध्ये भीमराव केराम यांना मंत्रीपद मिळणार असल्याच्या चर्चेने जोर धरला आहे.

८३ किनवट विधानसभा मतदारसंघासाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान संपन्न झाले असून दिनांक २३ नोव्हेंबर २०२४ रोजी किनवट येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत मतमोजणीची प्रक्रिया पूर्ण झाली सकाळी ७ वाजता मतमोजणीला प्रारंभ झाला सायंकाळी पाच वाजेपर्यंत एकूण



१४ टेबलवर २४ फेऱ्यांमध्ये मतमोजणी प्रक्रिया झाली या वेळेला एकूण १७उमेदवार रिंगणात होते महायुतीचे भीमराव केराम व महाविकास आघाडीचे प्रदीप नाईक यांच्यात तुल्यबळ लढत झाली. चौदाव्या फेरीपर्यंत प्रदीप नाईक आघाडीवर होते त्यानंतर त्यांची पीछेहाट सुरू झाली ती अंतिम फेरीपर्यंत कायम राहिली. पाच वाजेपर्यंत हाती आलेल्या निकालावरून भीमराव केराम यांना ९२०२८ मते तर त्यांचे प्रतिस्पर्धी प्रदीप नाईक यांना ८६३७९ इतकी मते मिळाली. चूरशीच्या लढतीत भीमराव केराम हे ५६४९ इतके मताधिक्य घेऊन विजयी झाले.प्रचाराच्या रणधुमाळीत सर्वत्र तुतारीची चर्चा झाली असली तरी निकालात मात्र कमळाने बाजी मारली असून किनवट विधानसभेतील भीमराव केराम यांचा हा दुसरा विजय आहे.या विजयानंतर महायुतीचे पदाधिकारी,कार्यकर्ते व नागरिकांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसमोर एकच जल्लोष साजरा केला तर किनवट शहरातील प्रमुख चौकात फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करण्यात आली या निवडणुकीत माजी आमदार प्रदीप नाईक यांनी आपली संपूर्ण राजकीय प्रतिष्ठा पणाला लावली होती परंतु तुल्यबळ लढतीत त्यांना पराभव पत्करावा लागला. किनवट विधानसभेसह महाराष्ट्र राज्यात महायुतीने एकतर्फी विजय प्राप्त केला असून महायुतीच्या मंत्रिमंडळात किनवटचे आमदार भीमराव केराम यांना मंत्रीपदाची संधी मिळणार असल्याच्या चर्चे ने जोर धरला आहे. किनवट विधानसभा मतदारसंघ हा आदिवासी, दुर्गम मागास म्हणून ओळखला जातो या भागाच्या सर्वांगीण विकासासाठी भीमराव केराम यांना मंत्रिपद मिळणार का याकडे सर्वांचेच लक्ष लागून आहे.

## चाळीस लाखाची लाच घेणाऱ्या लिपीकांना अटक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २३ नोव्हेंबर**

प्रलंबित वेतन मंजूर करुन घेण्यासाठी ४० लाखाची लाच घेणाऱ्या देगलूर तालुक्यातील निवासी शाळेच्या दोन लिपिकासह मुख्याध्यापकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापैकी दोन लिपिकांना अटक करण्यात आली आहे.

कुंटूरकर निवासी दिव्यांग कार्य शाळेतील एका कर्मचाऱ्याचे वेतन प्रलंबित होते. समाज कल्याण अधिकाऱ्याकडून ते मंजूर करुन घेण्यासाठी छत्रपती शाहु महाराज निवासी अपंग विद्यालय काबरानगर नांदेड येथील शिवराज बामणे व कुंटूरकर निवासी दिव्यांग कार्य शाळा राज कॉर्नर नांदेड येथील चंपत वाडेकर यांनी तक्रारदाराकडे ५४ लाख रुपये लाचेची मागणी केली. तक्रारदाराने ४८ लाखावर तडजोड केली. त्यानंतर तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली असता त्या तक्रारीवरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दि.१३, १५,१७, १८ व दि.२२ नोव्हेंबर रोजी लाचेची पडताळणी केली असता या पडताळणीत मुख्याध्यापक यादव सूर्यवंशी, लिपिक शिवराज बामणे व चंपत वाडेकर यांनी पंचासमक्ष ५४ लाख रुपये लाचेची मागणी केल्याचे आढळून आले. त्यानंतर दि.२२ नोव्हेंबर रोजी लिपिक शिवराज बामणे व चंपत वाडेकर यांनी नांदेड शहरातील छत्रपती चौकाजवळ तक्रारदाराकडून ठरलेल्या रक्कमेपैकी ४० लाख रुपये घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्यांना रंगेहात पकडले. या प्रकरणात वैभव निवासी शाळा खानापूरचे मुख्याध्यापक यादव मण्णाजी सूर्यवंशी, छत्रपती शाहु महाराज निवासी अपंग विद्यालयाचे लिपिक शिवराज बामणे व कुंटूरकर निवासी दिव्यांग कार्यशाळेचे लिपिक चंपत वाडेकर यांच्याविरुध्द भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक गजानन बोडके हे करीत आहेत. हि कारवाई पोलीस निरीक्षक गजानन बोडके, पोलीस हवालदार राजेश राठोड, अर्शद अहेमद खान, सय्यद कदीर, प्रकाश मामुलवार यांच्या पथकाने केली.

## सोमवारपासून रंगणार हौशी मराठी राज्य नाटय स्पर्धा

### नांदेडसह परभणीतील कलावंताचा राहणार सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २३ नोव्हेंबर**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजित ६३ वी हौशी राज्य नाट्य स्पर्धा नांदेड येथील कुसुम सभागृहात सोमवार ता.२५ नोव्हेंबरपासून ते ६ डिसेंबर दरम्यान सायंकाळी सात वाजता नाट्यप्रयोग सादर केले जाणार आहेत. सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा होत असल्याचे सांस्कृतिक कार्य संचालक विभिशन चवरे यांनी नमूद केले, नांदेड केंद्रावर एकूण १३ संघ सहभागी होणार आहेत. नांदेड शहरासह परभणी जिल्ह्यातील विविध संघांचे प्रयोग या केंद्रावर सादर होतील.

सोमवारी ता. २५ झपुर्झा सोशल फाउंडेशन, परभणीच्या वतीने विनोद डावरे लिखित आणि दिग्दर्शित शापित सेवा नाटकाने स्पर्धेला सुरुवात होईल. त्यानंतर मंगळवारी ता. २६ स्वप्नरंग सांस्कृतिक संस्था, नांदेडच्या वतीने इरफान मुजावर लिखित आणि दिनेश कवडे दिग्दर्शित व्हाईट पेपर सादर होईल. बुधवारी ता.२७ सांस्कृतिक मंच, नांदेडचे पुन्हा एकदा (लेखक: सुहास देशपांडे, दिग्दर्शक: रवी शामराज) सादर होणार आहे. गुरुवारी ता.२८ संकल्प प्रतिष्ठान, नांदेडचे मोटिव्हेशन स्पीकर (लेखक-दिग्दर्शक: संकल्प सूर्यवंशी) तर शुक्रवारी ता.२९ राजीव गांधी युवा फोरम, परभणीचे गंमत असते नात्यांची (लेखक: रवी झिंगरे, दिग्दर्शक: विजय करभाजन) सादर होईल. शनिवारी ता. ३० मुक्ताई प्रतिष्ठान, देगलूरचे ती रात्र हा दिवस (लेखक: सुहास देशपांडे, दिग्दर्शक: राजेश देगलूरकर) सादर होतील. रविवारी ता. १ डिसेंबर दुपारी १२ वाजता जागृती सामाजिक प्रतिष्ठान, नांदेडचे मी लाडाची मैना तुमची (लेखक: द. मा. मिरासदार, दिग्दर्शक: सत्यपाल नरवाडे) व संध्याकाळी ७ वाजता क्रांती हुतात्मा चारिटेबल ट्रस्ट, परभणीचे सहज सुचलं म्हणून (लेखक: रविशंकर झिंगरे, दिग्दर्शक: मनीषा उमरीकर) सादर होणार आहेत. सोमवारी ता. २ गोपाला फाउंडेशन, परभणीचे सेल्फी (लेखिका: शिल्पा नवलकर, दिग्दर्शिका: स्नेहल पुराणिक), मंगळवारी ता. ३ तन्मय ग्रुप, नांदेडचे वसुधैव कुटुंबकम (लेखक-दिग्दर्शक: नाथा चितळे), बुधवारी ता. ४ बालगंधर्व सांस्कृतिक कला क्रीडा व युवक मंडळ, परभणीचे विक्रमाचा घातांक 'क्ष' (लेखक: रविशंकर झिंगरे, दिग्दर्शक: अतुल साळवे), गुरुवारी ता. ५ आंबेडकरवादी मंच, नांदेडचे गांधी आंबेडकर (लेखक: प्रेमानंद गज्वी, दिग्दर्शक: राहुल जोंधळे), तर शुक्रवारी ता. ६ अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, नांदेडचे वेलींच्या गाठी (लेखिका: मेधा मराठी, दिग्दर्शक: गोविंद जोशी) यांचे प्रयोग सादर होणार आहेत.

## नायगाव मतदार संघात राजेश पवार प्रचंड मतानी विजयी

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. २३ नोव्हेंबर**

नायगाव मतदार संघातून आमदार राजेश पवार यांनी विकासाचा मुद्दा घेवून जनतेसमोर गेल्याने नायगाव मतदार संघातील जनता राजेश पवार यांच्या विरोद्धकाला न जुमानता मतदरानी पुन्हा एकदा राजेश पवार यांना प्रचंड मतानी विजयी करून महाविकास आघाडी व अंतर्गत विरोद्धी नेताचा सुपडा साप केला आणी महायुतीला प्रचंड मतानी विजयी केल्या बदल राजेश पवार यांनी नायगाव मतदार संघातील जनतेचे जाहीर आभार मानले आहे.

महाराष्ट्रात राज्य सकार महायुतीचे की महाविकास आघाडीच हे जनतेसह उमेदवारात धाकधुक होती. पण आज पर्यंत च्या निवडणूकत ही महायुतीला जनतेने कौल देवून इतिहासीक ठरली आहे जनतेने महायुतीला मतदान रूपी प्रेमाचा वर्षाव केला. त्याच प्रमाणे नायगाव मतदार संघातील लाडकी बहीन, लाडका भाऊ, महायुतीच्या काळात अडीच वर्षाच्या काळात जे नायगाव मतदार संघात विकास कामे झाले ते फळ जनतेनी दिली आहे.



माझ्या विरोद्धात नायगाव मतदार संघात खोक्याची अपेक्षा करून जे विरोद्ध मला या निवडणुकीत केला त्याना जनतेने धडा दिला तो इतिहासीक क्षण असुन हा विजय माझा नसून नायगाव मतदार संघातील जनतेचा आहे असे ही आमदार राजेश पवार यांनी म्हटले आहे. मतदार संघातील विविध पक्ष कार्यकर्ते माझ्या विरोद्धात गेली होती पण पंचवार्षीक निवडणुकीचा अनुभव असल्याने आमदार म्हणून कार्यकर्ते आणि जनतेचा मला अनुभव आल्यामुळे विरोद्धकाला न जुमानता जनतेवर विश्वास ठेवून ही निवडणूक लढविली आहे त्यामुळे मला धर्माबाद , उमरी नायगाव तालुक्यातील जनतेनी साहेब आम्ही तुमच्या पाठीशी आहे असा विश्वास ठेवून तुम्ही विकास केलात, आई - वडिलांना जसे श्रावणबाळ कावड घेऊन सांभाळले तसे तुम्ही मतदार संघात सेवा करून सांभाळत म्हटल्यावर मला बळ आले आणि जनता मला निवडून दिली आहे ते येणाऱ्या पाच वर्षात जनेतेचे ऋणात राहून गेल्या पाच वर्षा पेक्षा ही अधिक विकास कामे करणार आहे. उमरी - धर्माबाद - नायगाव तालुक्यात आ राजेश पवार यांची प्रचंड मतानी विजयी होताच डोल ताशाच्या गजरात पटाके लावून जल्लोष करण्यात आला आहे.

नायगाव मतदार संघातील मतदारजनता आ राजेश पवार यांना भेटण्यासाठी अलोट गर्दी करून अभिनंदनाचा वर्षाव केरीत आहेत . आ राजेश पवार यांचा विजय असत्याच्या विरोद्धात सत्याचा विजय झाला असे मतदार संघात धुमधड्याक्यात बोलले जाते आहे. आ. राजेश पवार आणि त्यांची पत्नी पुनमताई पवार जे राजकीय डाव टाकीत विकास कामे केले राजकारण केले ते उग न्हव माय काल जे राजकीय लोक एक आमदार एक कामदार म्हणून निवडूकीच्या तोंडावर वल्गना केली त्यांना राजकीय चपराक या विद्यान सभेच्या विजया नंतर बसली आहे. आता जे मतदान केले ते जय हो न मतदान केले ते ही जय हो म्हणून राजेश पवार तुम्ह आगे पडो हम तुम्हारे साथ है असे बोलतांना दिसून येत आहे जरांगे फॅक्टर भाजप विरोद्धी मराठा समाज इतर मागास्वर्गीय, मुस्लीम समाजे विकासावर फोकस करीत मोठा मताधिक्याची पंसती आ राजेश पवार यांना दिल्याने हा विजय विकास आणि जनतेच्या संघर्षमय ठरला आहे.